गुरुवार, ८ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १७१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

•MARATHI •DAINIK •CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 8 FEBRUARY 2024 adhunikkesari.com •YEAR-03 •ISSUE-171 •RNI : MAHMAR/2021/82566 •PAGE-12 •PRICE-05

## डॉ. आंबेडकरांना भारतरत्न का दिला नाही

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** कर्पुरी ठाकूर यांचे योगदान इतके मोठे असूनही इतक्या वर्षांमध्ये काँग्रेसने त्यांचा सन्मान केला नाही. काँग्रेसची सत्ता इतका काळ देशात होती. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाबद्दल त्यांना भारतरत्न द्यावा, असे काँग्रेसला वाटले नाही. काँग्रेसने सत्तेवर असताना फक्त आपल्या घराण्यातल्या लोकांना पुरस्कार दिले. तसेच काँग्रेसने ओबीसींना आरक्षणही नीट दिले नाही, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राज्यसभेत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

ते पुढे म्हणाले की, काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळूनही ब्रिटिशांच्या मानसिकतेने गुलामगिरीची मानसिकता पसरवत काम केले असे त्यांनी म्हटले. एवढेच काय काँग्रेसने बजेट म्हणजेच अर्थसंकल्प सादर करण्याची वेळ ही देखील संध्याकाळी ५ अशी निवडली होती. कारण ब्रिटनमध्ये तेव्हा सकाळचे नऊ वाजलेले असत. ही उदाहरण देऊन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसची अक्षरशः पिसे काढली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार संपवण्यासाठीचे कुठलेही प्रयत्न काँग्रेसने सोडले नाहीत. त्यांना भारतरत्न पुरस्कार भाजपाच्या पाठिंब्याने जे सरकार स्थापन झाले होते तेव्हा त्यांना पुरस्कार जाहीर झाला. सीताराम केसरी हे मागास होते, काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांना अध्यक्षपदावरुन रस्त्यावर फेकण्यात आले. त्याचा व्हिडीओही उपलब्ध आहे. यांचे एक मार्गदर्शक अमेरिकेत आहेत. गेल्या वेळी निवडणुकीच्या वेळी हुआ तो हुआ साठी प्रसिद्ध झाले होते. त्यांनी काही दिवसांपूर्वी बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान काही नव्हते हे सांगायचा प्रयत्न केला. देशात पहिल्यांदा आदिवासी समाजातली स्त्री राष्ट्रपती झाली. तुमचा आमच्याशी वैचारिक विरोध होता का? नाही. तसे असते तर तुम्ही आमच्या विरोधात तसा सशक्त उमेदवार दिला असता. पण तुम्हाला आदिवासी समाजाच्या भगिनीचा अपमान करायचा होता म्हणून तुम्ही उमेदवार दिला. असाही आरोप नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. एवढेच नाही राष्ट्रपतींसाठी जी भाषा त्यांनी (काँग्रेसने) वापरली ती तर निषेधार्हच आहे, असेही मोदी म्हणाले आहेत.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न पुरस्कार कुणी दिला?**
भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ३१ मार्च १९९० या दिवशी मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यावेळी देशाचे पंतप्रधान व्ही. पी. सिंग होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक विषमता मिटवून समता आणण्याचे जे प्रयत्न केले तसंच आयुष्यभर समाजातल्या पीडितांसाठी जो संघर्ष केला त्या कार्याला अभिवादन करत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला होता.

पाहिजेत
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
धाराशिव जिल्ह्यातील परंडा, भूम, धाराशिव, तुळजापूर, कळंब, उमरगा, वाशी, लोहारा येथे तालुका प्रतिनिधी नेमणे आहेत.
इच्छुकांनी आपला अर्ज व बायोडेटा फोटोसह मेल किंवा व्हॉट्सॲप करावा
सचिन कोरडे
जिल्हा प्रतिनिधी
90219 20903
aadhunikkesari@gmail.com

## बाळूमामाच्या भंडाऱ्यातून तीन हजार लोकांना विषबाधा

### आमदार रोहिदास चव्हाण यांच्याकडून रुग्णांना धीर

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा : तालुक्यातील कोष्टवाडी येथे संत बाळुमामा यांच्या पालखी सोहळ्यात आरतीचा कार्यक्रम झाल्यानंतर भंडारा प्रसादात दि.(६) फेब्रुवारी रोजी एकादशी असल्यामुळे भाविकांना भगर व आमटीचा फराळ वाटप करण्यात आला होता. सावरगाव न., कोष्टवाडी, हरणवाडी, रिसनगाव, पेंडु, मुरंबी, मस्की, मंचू तांडा, केसू तांडा, आमरु तांडासह अन्य गावांतील व्यक्तींनी फराळ सेवन केल्याने मळमळ, उलटी होऊन विषबाधा झाली. यामध्ये अंदाजे २५०० ते ३००० लोकांचा समावेश असून सदरील रुग्णांना लोहा येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात तसेच खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

यात लोहा येथील उपजिल्हा रुग्णालयात ७०० तर विष्णूपूरी येथील जिल्हा रूग्णालयात सरासरी १५०० रूग्ण पाठविण्यात आले आहेत. यावेळी १०२ च्या ८ रूग्णवाहीका तर १०८ च्या ५ रूग्णवाहीका तसेच एसटी बससह अन्य खाजगी वाहनांनी काही रुग्णांना शासकीय रुग्णालय नांदेड, अहमदपूर येथे दाखल करण्यात आले आहे. विषबाधा झालेल्या रुग्णांना उपचार प्रकिया चालु असल्याची माहिती मिळाली आहे.डॉ. बारी वैद्यकीय अधीक्षक, डॉ. पानसुळे, डॉ. भालके, डॉ. जाधव, डॉ. कुलदिपके, डॉ. सोनकांबळे, डॉ. लोहारे, डॉ. दिनेश राठोड, डॉ. मोटे, डॉ. देशमुख यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करून रुग्णांचे प्राण वाचविले. तसेच लोहा पत्रकार संघाचे विलास सावळे, शिवराज पवार, संजय कहाळेकर, प्रविण महाबळे, विनोद महाबळे, मारोती चव्हाण, पोलिस निरीक्षक, अधिक्षक, तहसीलदार शंकर लाड, तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष मारोती कदम, नायब तहसीलदार, असंख्य अधिकारी व कर्मचारी यांचेही मदत कार्य चालू आहे.

यावेळी १०२ चे चालक अतीश कांबळे, बालाजी घोडके, सुरेश जाधव, मेहर, सिद्धार्थ ससाणे, ज्ञानदेव आधड, भुतेवाड, स्वामी सिस्टर, आदिती गांजापूरकर सिस्टर, चाटे सिस्टर, कलमे सिस्टर, तेलंग , खिल्लारे, केंद्रे मामा आदींनी रूग्णांना उपचारासाठी मदत करत शर्थीचे प्रयत्न केले. डॉ. कानवटे, डॉ. धनसडे, डॉ. पवार, डॉ. ब्याळे, डॉ. किलजे डॉ. राठोड आदींनी खासगी रूग्णालयात विषबाधा झालेल्या रुग्णांवर उपचार केले. विषबाधा झाल्याची बातमी कळताच माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी भेट देऊन विचारपूस करत डॉक्टरांना रुग्णावर उपचार करण्यासाठी सुचना दिल्या. तसेच रूग्णांच्या नातेवाईकांना खिचडीचे वाटप केले. माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शरद पाटील पवार यांनी रात्री बेरात्री प्रचंड मेहनत घेतली. माजी जि. प. सदस्य पुरुषोत्तम धोंडगे यांनी नारळपाणी व रूग्णांना गाड्यांची व्यवस्था केली, तसेच प्रहार संघटनेचे माऊली भाऊ गीते यांनी व माळाकोळी येथील सर्व शिल्पकार यांनी खाजगी वाहनांची सोय केली. सामाजिक कार्यकर्त्या प्रणिताताई देवरे -चिखलीकर यांनी लोहा येथील उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली. लोह्यातील सामाजिक कार्यकर्ते अनिल धुतमल, शिवा संघटनेचे तालुका उपाध्यक्ष साधु वडजे, काँग्रेसचे तालुका संघटक तथा सावरगावचे माजी सरपंच दिलीप जाधव, चेअरमन बालाजी कदम, भारत कदम यांनी रुग्णांना उपचारासाठी मदत केली. तसेच नांदेड जिल्हा चिकित्सक नीळकंठ भोसीकर यांनी तात्काळ रुग्णालयात येऊन भेट दिली. सदरील रूग्णांना विष्णूपूरी नांदेड येथील जिल्हा रुग्णालय, पालम, अहमदपूर, कंधार, लोहा शहरातील खासगी दवाखाने आदी ठिकाणी रूग्णालयातील रूग्णांवर उपचार चालू होते. तसेच डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टरांची टिम लोहा येथील उपजिल्हा रुग्णालयातील रूग्णांच्या उपचारासाठी धावून आली. लोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, माळाकोळी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक निरपत्रेवार यांनीही वाहन उपलब्ध करून देण्यासाठी मदत केली.



माजी आ. तथा लातूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख रोहिदास चव्हाण यांना संबंधित वार्ता कळताच पहाटे ०३ वाजता उपजिल्हा रुग्णालयाकडे धाव घेऊन संबंधित डॉक्टर व वैद्यकीय यंत्रणेला योग्य त्या सूचना करून संबंधित रुग्णावर उपचार करण्यास सांगितले. त्याच ठिकाणी आमदार रोहिदास चव्हाण यांनी रुग्णांना व रुग्णांच्या नातेवाईकांना सकाळच्या नाश्त्याची व्यवस्था केली व सर्व रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना धीर दिला.

## बांबू फर्निचर प्रशिक्षणाच्या माध्यमातून तरुणांना रोजगाराचे साधन

### तीस दिवसीय बांबू फर्निचर प्रशिक्षण कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज


प्रा. शाम हेडाऊ

चंद्रपूर : झपाट्याने विस्तार होत असलेल्या बांबू क्षेत्रात युवकांना रोजगाराचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली च्या वतीने 30 दिवसीय बांबू फर्निचर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा नुकताच समारोप करण्यात आला. कार्यक्रमाला प्रशिक्षण केंद्राचे संचालक अशोक खडसे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. मल्लेलवार, प्रशिक्षणाचे तांत्रिक मार्गदर्शक शिरीष कनेर, किशोर गायकवाड, राजू हजारे, शशिकांत मोकाशे, वनपाल कोसनकर व संस्थेचे विद्यार्थी तसेच कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून युवक-युवतींना विविध यंत्रसामुग्री हाताळणे, विविध आकृतीज्ञान व जीवनापयोगी फर्निचर तयार करण्याबाबत तांत्रिक मार्गदर्शनाबरोबरच उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजना व बँकिंग क्षेत्रातील वित्त पुरवठ्याबाबत माहिती देण्यात आली. सर्वसामान्य जीवनात बांबूवर आधारीत वस्तूंचा जास्तीत जास्त वापर वाढावा व त्यातून युवकांना रोजगार प्राप्त व्हावा या उद्देशाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणात महाराष्ट्राच्या 10 विविध जिल्ह्यातील सहभागी 15 युवक-युवतींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या युवक-युवतींनी बांबू दूत म्हणून



संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत राहून बांबूक्षेत्राची प्रचार-प्रसिद्धी करावी, असे मार्गदर्शन केंद्राचे संचालक अशोक खडसे यांनी यावेळी केले. प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या विविध बांबू वस्तूची प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. बेरोजगार युवकांना या प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराचे साधन मिळाल्याचा विश्वास प्रशिक्षणार्थ्यांनी व्यक्त केला.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

ब्रिटिश सरकार नामक त्रिकोणाची तिसरी बाजू गेल्यावर हिंदू मुस्लिम एक होण्याऐवजी त्या दोन बाजूत संघर्ष निर्माण झाला. फाळणी झाली. दंगे भडकले. अन्याय, अत्याचार, महिलांवरील बलात्कार, सामूहिक हत्या अशा रक्तरंजित आणि छातीत धडकी भरवणाऱ्या बातम्या रेडिओ आणि वर्तमानपत्रातून येऊ लागल्या. स्वातंत्र्याचा आनंद साजरा करावा की अशा घटनांबद्दल शोक व्यक्त करावा असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला. व्यापारी साठेबाजी करू लागले. काळाबाजार या नावाचा एक नवीनच अपरिचित बाजार आकार घेऊ लागला. नफेखोरी हेच उद्दिष्ट असलेल्या कंपन्या राजकीय पक्षांना निधी देऊ लागल्या. या पक्षांनी देशासाठी कार्य करावे अशी प्रामाणिक इच्छा या कंपन्यांची किंवा भांडवलदारांची होती यावर भाबडा विश्वास ठेवायची गरज नाही हे सर्वसामान्य माणसाला सुद्धा लक्षात आले. पण त्यावर नियंत्रण ठेवणे हे सामान्य माणसाच्या हातात नव्हतेच. ध्येयवादी, त्यागी नेत्यांच्या पिढ्या संपुष्टात येऊ लागल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात देशासाठी त्याग करणारे नेते सत्तेची खुर्ची दृष्टीपथात येताच बदलले. अंगावरची खादी आणि डोक्यावरची गांधी टोपी हिचा रोख सर्वसामान्यांच्या दिशेने न वळता सत्तेच्या दिशेने वळू लागला. सत्तेचे फायदे नेत्यांच्या मुलांना, नातेवाईकांना मिळू लागले. सत्तेचे वारसदार तेच ठरू लागले. गावागावात पांढऱ्या टोप्यांचे पीक आले. नीतिमूल्ये सोयीस्कररीत्या पाळली जाऊ लागली. आपल्या पक्षातील अनुयायी, सहकारी नेत्यांची लांडीलबाडीची, भ्रष्टाचाराची प्रकरणे दडपून ठेवून त्या आधारे नेते मंडळी त्यांचा हवा तसा वापर करू लागली. त्यांना आपल्या दावणीला बांधून ठेवू लागले. स्वातंत्र्यपूर्व काळात सर्वसामान्य जनतेला ज्या पद्धतीने सरकारी अधिकारी वागवत होते, त्यात बदल होईल अशी आशा जनतेला होती. सर्वसामान्य जनतेला पुन्हा उपेक्षित जगणे आले. अधिकारी, नेते यांची युती तयार झाली. सरकारी कार्यालयात काही कामासाठी गेलेल्या सर्वसामान्य माणसाला समोरच्या खुर्चीत बसा असे म्हणणे तर दूरच पण त्यांच्याकडे लवकर लक्षही जाणे कठीण झाले.






# आनंदी पहाट

## घरापेक्षाही मनच मोठे असावे

आधुनिक केसरी

आजवर मनावर अनेकप्रकारे अनेकांनी भाष्य केले आहे. संतांनी देखील जगाला एकच गोष्ट सांगितली, ती म्हणजे मनाचे स्वास्थ्य टिकवा. ह्याचा अर्थ शरीराकडे दुर्लक्ष करा, असे अजिबात नाही. परंतू मन दिसत नसल्यामुळे त्याचा विचार आपल्याकडून कमी होत असतो. शरीर मात्र दिसत असते, त्यामुळेच ते सदैव सुंदर ठेवले जात असते.शरीराचीच काळजी अधिक घेतली जाते. शरीराला पौष्टिक खाद्य देण्यातही आपण कधी मागे हटत नाही, खर्चाचा तर अजिबातच विचार करत नाही. शारीरिक तंदुरुस्तीसाठी खरे म्हणजे मानसिक स्वास्थ्यच अधिक महत्वाचे आणि मोलाचे असते. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने एकूणच जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या कार्यकृतीत इतका विचार केलेला नसतो, हेही तितकेच खरे. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. ह्यात सकारात्मक आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. त्यासाठी आपल्या जिव्हाळ्याचे, हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. ते घर कितीही छोटे असले तरीही फरक पडत नाही, पण आपले मन मात्र मोठेच असायला लागते. अर्थात, घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते.



आधुनिक केसरी

## भेटशी केशवा | आळंदीत ||

मना लागेओढ | तुझ्या दर्शनाची ||
साद अंतरीची | घाली वारा ||१||
माय इंद्रायणी | बोलविते मज ||
माहेराची आज | ओढ लागे ||२||
ध्यानी मनी वसे | माऊलीचे रूप ||
गोविंद स्वरूप | ज्ञानराजा ||३||
व्याकुळला जीव | सोसवेना दुरी ||
तळमळ करी | रात्रंदिन ||४||
मान पान काही | नको मज देवा ||
भेटशी केशवा | आळंदीत ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


# निरुपण

आधुनिक केसरी

शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना ।
स्वर्गनरकादिं भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम् ॥ ३ ॥
येक ताप आध्यात्मिक । दुजा तो आदिभूतिक ।
तिसरा आदिदैविक । ताप जाणावा ॥ ९ ॥
आध्यात्मिक तो कोण । कैसी त्याची वोळखण ।
आदिभूतिकांचें लक्षण । जाणिजे कैसें ॥ १० ॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

कोश अन्नमय प्राणमय,
और मनोमय जान ।
कोश एक विज्ञान मय, मय आनन्द
अमान ।।४५।।(द्वितीय मण्डल सप्तम
अध्याय) ०२/०७/४५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
अन्नमय, प्राणमय, मनोमय,
विज्ञानमय आणि आनंदमय
हे पंचकोश या शरीरात आहेत,
ज्यांच्याद्वारे आत्म्याचे प्राकृतिक कार्य
या शरीरात चालते. हा आनंदमय
कोशही प्राकृतिक आहे, ज्याच्याद्वारे
जीवात्म्यास प्राकृतिक सुख आणि हर्ष
प्रकट होतो, जो क्षणिक आणि अनित्य
आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ६४वे

पहाता पहाता वर्ष सरले ।
एक वर्षापूर्वी गोंदवले सोडले।
जातांना आईस सोबत होते नेले। परतीला मात्र
ते आईविनाच परतले ।। १ ।।
श्रीमहाराज आल्याची वार्ता कळली । गावकरी
मंडळी सांत्वनास आली । गीतामाईंच्या
आठवणींनी सारी गहिवरली। सार्थक जीवन
माईंचे, म्हणती सारे जन ।।२ ।।
सन-१८९६ उजाडले । ते दुष्काळाला
घेऊन आले । महाराज मदतीस धावले ।
गोंदवलेकरांच्या ।। ३ ।।
श्रीमहाराज गोंदवल्यास आले । दूरचे भक्त
भेटण्या येऊ लागले । गजबजून गेले गाव
गोंदवले ।। ४ ।। जन सारे आनंदून जाती।
महाराजांच्या सहवासात दुःख विसरती ।
श्रीमहाराज सर्वावर प्रेम करिती । कृपा त्यांची
सर्वांवर ।। ५ ।। विष्णुबुवा कुंभारे गोंदवल्यास
येती । अनुग्रह द्या म्हणती।
श्रीमहाराज स्मरण देती । त्यांस पूर्वगुरूंचे ।।६ ।।
बुवानी त्यांची कथा सांगितली।
मग महाराजानी कृपा केली।
रामनाम जपाची आज्ञा केली । वऱ्हाडात
गेल्यावर बुवानी मठाची स्थापना केली ।
श्रीमहाराजांच्या नावे ।। ७ ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# नामाचे त्रिकालाबाधित श्रेष्ठत्व!

आधुनिक केसरी

नाम हे सच्चिदानंद-स्वरूप आहे. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदी अगदी जवळ कुणी असेल तर ते फक्त नामच होय. नाम हे चिन्मय असल्यामुळे त्याचा आनंद ओसंडून येतो आणि ही सृष्टी तयार होते. अनेक रूपे घडविणे, ती मोडणे आणि नवीन तयार करणे, पण आपण स्वतः मात्र मूळ स्वरूपाने राहणे, ही केवढी विलक्षण लीला आहे ! खरोखर, तुम्हाला मी काय सांगू ! बोलायला शिकल्यापासून आजपर्यंत मी नामाबद्दलच बोलत आहे, अजून नामाचे माहात्म्य संपत नाही. नामाचे माहात्म्य सांगून संपले तर भगवंताचे भगवंतपण लटके झाले असे समजावे. जो नामात 'मी'पणाने नाहीसा झाला त्यालाच नामाच्या माहात्म्याची कल्पना आली. असा पुरुष नामाविषयी मौन तरी धरील, कारण त्याचे माहात्म्य कोणालाच सांगता येणार नाही; किंवा शेवटच्या श्वासापर्यंत नामाचे माहात्म्यच सांगत राहील, कारण ते कितीही सांगितले तरी संपणार नाही, आणि कितीही ऐकले तरी तृप्ती होणार नाही. नामाने सर्व पापे नाहीशी होतात. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे.



नामाने भगवंताचे स्मरण होते.नाम हे वेदांपेक्षाही श्रेष्ठ आहे. कसे ते पहा. वेदाध्ययनापासून फायदा होण्यासाठी चारी वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे. त्यासाठी पुष्कळ वेळ आणि श्रम लागतात. नामाला श्रम नाहीत. दुसरे, वेदांचा अधिकार सर्व लोकांना नाही, पण नाम कुणीही घ्यावे. वेदांच्या मंत्रांचा आरंभ ॐकारानेच होतो, म्हणून वेदारंभी देखील नामच आहे. नाम हे तीर्थयात्रेपेक्षा श्रेष्ठ आहे. अंतरंगामध्ये बदल होण्यासाठी यात्रा करायची असते; पण त्याला श्रम, पैसा, प्रकृती वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. नाम हे घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देते. पंढरपूरला जाऊन नाम घेण्याचे जर न शिकला तर जाणे व्यर्थ गेले म्हणावे. नाम घ्यावे अशी बुद्धी होण्यासाठीच तिथे जाणे जरूर आहे. नाम हे सर्व सत्कर्मांचा राजा आहे. सत् म्हणजे भगवंत, त्याच्याकडे नेणारे जे कर्म तेच सत्कर्म. इतर कर्मे आडवळणाने भगवंताकडे नेतात, नाम हे साक्षात् भगवंताकडे पोहोचवते. नामाने भवरोग नाहीसा होतो. भव म्हणजे विषय. विषयांची आसक्ती असणे हा सर्व रोगांचा पाया आहे. नाम घेतल्याने भगवंताकडे प्रेम लागते आणि इतर ठिकाणची आसक्ती सुटते. नामाने सर्व दुःखे नाहीशी होतात, कारण या दुःखांचे मूळ विषयांच्या आसक्तीमध्ये आहे, आणि नामाने ती आपोआप सुटते, म्हणून दुःख नाहीसे होते. शिवाय, भगवंत हा आनंदरूप असल्याने त्याला नामाने घट्ट धरला की दुःख त्या ठिकाणी कसे राहू शकेल ? ४४. प्रत्येक मनुष्याने भगवंताचे नाम घ्यावे, त्याचे ध्यान करावे, त्याच्या स्मरणात राहावे, आणि आपल्या जन्माचे सार्थक करून घ्यावे.

# कान्होपात्रा

आधुनिक केसरी

प्रपंचात राहूनही परमार्थात जाणता प्रभाव पाडता येतो. त्यासाठी आपल्यातले अज्ञान दूर केले पाहिजे. अज्ञानामुळे माणूस भ्रमात रहातो. आणि तिथेच तो फसतो. अज्ञानामुळे शत्रु जिंकतो.


पोलीसासह माजी सभापतींना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न
शासकीय कामात अडथळा व दंगलीचे गुन्हे

पान ६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, ८ फेब्रुवारी २०२४


# तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात अनागोंदी कारभार

## खासगी एजंटांचा सुळसुळाट : मनसेने केली कारभार सुरळीत करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**लक्ष्मण मडके**

**शेवगाव :** तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचा कारभार तातडीने सुरळीत करावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शेवगाव तालुका अध्यक्ष गणेश रांधवणे यांनी पत्राद्वारे तहसीलदार प्रशांत सांगडे यांचेकडे केली आहे.

सविस्तर वृत असे कि, शेवगाव तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात अंत्यत अनागोंदी कारभार सुरु असुन नविन रेशन कार्ड काढणे, रेशनकार्डमध्ये नाव समाविष्ट करणे, व सर्वात

> सदर ऑफिसमध्ये अनधिकृत व्यक्ती काम करीत असून, त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण नाही, स्वत :चे घर असल्यासारखे ते सरसपणे पुरवठा ऑफिसमध्ये वागत आहेत.

महत्वाचे रेशनकार्ड ऑनलाइन करणे या कामासाठी नागरिकांची मोठी हेळसांड होत असुन नागरिकांना यासाठी पुरवठा विभागात महिनों महिने चकरा माराव्या लागत आहे. या कामासाठी अनेक महिला तसेच वयोवृद्ध नागरिक दिवसभर पुरवठा कार्यालयाच्या बाहेर बसून असतात. तसेच पिवळे रेशनकार्ड काढण्यासाठी ठराविक रक्कम घेऊनच पिवळे रेशनकार्ड दिले जात असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.आयुष्मान भारत कार्ड काढण्यासाठी लाभार्थ्यांचे रेशनकार्ड ऑनलाइन असणे आवश्यक असल्याने अनेक नागरिक कित्येक दिवस यासाठी या कार्यालयात चकरा मारत आहेत. कार्यालयाला आजपर्यंत किती पिवळे रेशनकार्ड प्राप्त झाले व ते कोणास दिले गेले याची चौकशी झाली तर मोठा घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता असुन यावर जिल्हापुरवठा विभागाचे कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याचे दिसुन येते.

मात्र या विभागाचे कामकाज सुरळीत होताना दिसत नाही. या सर्व कामासाठी नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या देखील तक्रारी आहेत. अनेक नागरिकांच्या या संदर्भात तक्रारी असताना देखील या कार्यालय प्रमुखाची या विभागातून बदली होत नाही हे विशेष आहे यासाठी कुठला सरकारी वरदहस्त पुरवठा विभागाला प्राप्त आहे हे समजण्यास मार्ग नाही असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे.या विभागात आपण तातडीने फेरबदल करुन या विभागाचे कामकाज सुरळीत करावे. हा विषय आपल्या स्तरारील असल्या कारणाने या संदर्भात आंदोलन करण्याची वेळ आपण येऊ देऊ नये अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तहसीलदार यांना पत्रानुसार करण्यात आली आहे.

# केडीएमसीच्या लिपिकाला लाच घेताना अटक

## ठाणे अँण्टी करप्शनची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** मालमत्ता कराची आकारणी करण्याच्या बदल्यात ५० हजारांची लाच स्वीकारताना पालिकेचा वरिष्ठ लिपिक योगेश महाले याला ठाणे अँण्टी करप्शनच्या पथकाने केडीएमसीच्या 'ह' प्रभागात रंगेहात अटक केली. यावेळी निवृत्त कर्मचारी सूर्यकांत कर्डक यालाही बेड्या ठोकल्या आहेत. डोंबिवली पश्चिमेकडे राहणाऱ्या तक्रारदाराने कर्डक याला मालमत्ता कराची आकारणी करण्यासाठी पैसे दिले होते. मात्र तरीही त्याने कर आकारणी केली नव्हती. आपण निवृत्त झालो असल्याने संबंधित अधिकाऱ्यांना परत पैसे द्यायला लागतील, अशी बतावणी करून त्याने पुन्हा तक्रारदाराकडे ५० हजार रुपयांची मागणी केली. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. आज दुपारी ही रक्कम कर्डकच्या वतीने वरिष्ठ लिपिक योगेश महाले याने स्वीकारताच अधिकाऱ्यांनी त्या दोघांनाही अटक केली.



# रमाईचा त्याग राष्ट्र निर्मितीसाठी

## आ. राजेश टोपे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा त्याग असतोच परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या यशामध्ये रमाईचा असलेला त्याग त्यांच्या कुटुंबासाठी नसून अखिल राष्ट्रासाठी असल्याचे प्रतिपादन आ.राजेश टोपे यांनी केले. सौ.मनिषाताई टोपे व विद्रोही बिएमसी विचार मंच यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या त्यागमुर्ती माता रमाई यांच्या 126 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये आ.राजेश टोपे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये सौ.मनिषाताई टोपे यांनी दरवर्षी रमाई जयंती घेण्याचा उद्देश सांगत असताना महिलांना आपल्या पतीच्या संघर्षात खांद्याला खांदा लावून उभा रहाण्याचे आवाहन केले. यावेळी सुप्रसिद्ध गायक अरुण घुले यांच्या भिमगिताच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी,शेकडो अंबेडकरी अनुयायी महिला, पुरुष उपस्थित होते.




# जिल्हा कचेरीवर 'आरक्षण बचाव महामोर्चा'

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सर्व मागासवर्गीय तसेच अनुसूचित जाती-जमातीमधिल नागरिकांच्या आरक्षणाला धोका निर्माण करणाऱ्या दोन अधिसूचना महाराष्ट्र सरकारने मागे घ्याव्या तसेच जातनिहाय जनगणना करण्यात यावी या प्रमुख मागण्यांसाठी चंद्रपुरातील गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत बुधवारी दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी 2 वाजेदरम्यान मोर्चा काढण्यात आला.अनुसुचित जाती-जमाती तसेच भटक्या विमुक्त जातीच्या विविध संघटनांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. मोर्चामध्ये जिल्ह्याभरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाच्या मार्गावर विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी पेंडालल टाकून मोर्चाचे स्वागत केले. तसेच या मोर्चाला आपला पाठींबा दर्शविला.

महाराष्ट्र शासनाने २७ डिसेंबर २०२३ व २६ जानेवारी २०२४ रोजी आरक्षणाच्या संदर्भात दोन अधिसुचना काढल्या. या अधिसुचनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यास जातीचे खोटे दाखले व जातवैधतेचे खोटे प्रमाणपत्र मिळणे शक्य होईल. त्यामुळे भविष्यात अनुसूचित जाती,अनुसुचित जमाती तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील मुळ व खऱ्या नागरिकांच्या आरक्षणाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्या अधिसुचना रद्द करण्यात याव्या, तसेच जातनिहाय जनगणना करण्यात यावी, यासाठी गांधी चौकातून मोर्चा काढण्यात आला. मोर्चा जिल्हाधिकारी संयोजक सचिन राजूरकर यांनी भूमिका मांडली. यावेळी प्रमोद बोरीकर यांनी अनुसुचित जमातीचे तर नभा वाघमारे यांनी अनुसुचित जातीचे प्रतिनिधी म्हणून भूमिका मांडली. बबलू कटरे यांनी सुद्धा भूमिका विशद केली यानंतर मोर्चात सहभागी नागरिकांच्या मागणीनुसार विरोधी पक्षनेते विजय चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार व वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांनी दोन्ही अधिसूचना रद्द होण्यासाठी विधानसभेत संपूर्ण ताकदीनिशी संघर्ष करण्याचा शब्द उपस्थित जनसमुदायाला दिला.

जिल्हा प्रशासनातर्फे उपनिवासी जिल्हाधिकारी कुंभार यांनी मोर्चाच्या ठिकाणी निवेदन स्वीकारले. निवेदन देताना मोर्चाच्या आयोजन समितीचे संयोजक, दिनेश चोखारे, नंदू नागरकर जयदीप रोडे, सतिश भिवगडे, मनीषा बोबडे, गोमती पाचभाई,डॉ.दिलिप कांबळे, प्रविण खोब्रागडे, पांडुरंग टोंगे, अनिल धानोरकर, विलास माथनकर, जितेश कुळमेथे, विजय मडावी,कृष्णा मसराम, रविंद्र टोंगे, विजय बलकी, प्रेमानंद जोगी, पांडुरंग टोंगे, सूर्यकांत खनके, प्रा.अनिल शिंदे, भोला मडावी, राजा अडकीने, अवधूत कोटेवार, अमोल घोडमारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम लेडे, डॉ. संजय घाटे व पप्पू देशमुख तसेच आभार प्रदर्शन ॲड.पुरूषोत्तम सातपुते यांनी केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार व अजित पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट),गोंडवाना गणतंत्र पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, यंग चांदा ब्रिगेड, आम आदमी पार्टी, भारतीय जनता पार्टी, शेतकरी संघटना जनविकास सेना अशा विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच अनेक सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

विशेष म्हणजे मोर्चाचे नेतृत्व महिला व मुलींनी केले. नामदार विजय वडेट्टीवार, आमदार प्रतिभा धानोरकर यांनी मागे राहुन मोर्चात सहभाग घेतला.



# लोकायुक्तांच्या आदेशाचा अनादर; ठाणे काँग्रेसचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश कांबळे**

**ठाणे :** लोकायुक्तानी दिलेल्या आदेशानंतरही अनधिकृत बांधकामावर कर आकारणी व पाणीपुरवठा करण्यात आला असून संबंधित जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्याची मागणी आज ठाणे शहर कॉग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. ठाणे शहर कॉग्रेसच्या वतीने एका पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी शहर कॉग्रेस अध्यक्ष अँड.विक्रांत चव्हाण यांच्यासह कॉग्रेसचै मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे,जेष्ठ उपाध्यक्ष भालचंद्र महाडिक,प्रवक्ते राहुल पिंगळे,महिला अध्यक्षा स्मिता वैती व मंजूर खत्री आदि पदाधिकारी उपस्थित होते.याप्रसंगी बोलतांना कॉग्रेस शहराध्यक्ष अँड.विक्रांत चव्हाण यांनी सांगितले अनधिकृत बांधकामावर आळा बसावा म्हणून लोकायुक्त यांच्याकडे तक्रार केली होती आमच्या या तक्रारींची दखल घेऊन मा.लोकायुक्त यांनी महानगरपालिकेला आदेश दिले होते की,अनधिकृत बांधकामावर यापूढे पाणी पुरवठा,कर आकारणी तसेच वीजपुरवठा करण्यात येऊ नये परंतु लोकायुक्तांनी दिलेल्या आदेशानंतरही मागील दोन वर्षांत झालेल्या सर्वच अनधिकृत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यांना करआकारणी व पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे,आताही नवीन आयुक्तांनी पून्हा एकदा याबाबत सर्व सहाय्यक आयुक्तांना आदेश दिले आहेत मात्र मागील दोन वर्षांत शेकडो अनधिकृत बांधकाम झालेल्या इमारतिंचा पाणीपुरवठा, करआकारणी करण्यात आली याची पूर्ण चौकशी करण्यात यावी व याकाळात जे जे अधिकारी होते त्यांना जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी जर कोणी निवृत्त झाले असतील तर त्याची पेन्शन थांबविण्यात यावी मागणी केली आहे. आज आम्ही आयुक्तांची भेट घेऊन पत्राद्वारे मागणी केलेली आहे,जर याबाबत योग्य भूमिका आयुक्तांनी घेतली नाही तर काँग्रेस रस्त्यांवर उतरून आंदोलन करेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

# रोहित पवारांची सूचक पोस्ट

आधुनिक केसरी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत निवडणूक आयोगाने निकाल दिल्यानंतर त्यावरून आरोप-प्रत्यारोप चालू झाले आहेत. यासंदर्भात शरद पवार गटाकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दुसरीकडे अजित पवार गटाकडून या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर (ट्विटर) सविस्तर पोस्ट केली आहे.
या पोस्टमध्ये रोहित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सद्यस्थितीची तुलना थेट महाभारतामधील एका प्रसंगाशी केली आहे. त्यात त्यांनी दुर्योधन व अर्जुनाचाही उल्लेख केला आहे. रोहित पवार यांनी या पोस्टमध्ये कुरुक्षेत्रावरील युद्धाआधी दुर्योधन व अर्जुन श्रीकृष्णाला भेटायला गेले तेव्हाचा एक प्रसंग नमूद केला आहे. महाभारतात घडलेल्या प्रसंगाप्रमाणेच आज राष्ट्रवादी काँग्रेसची स्थिती आहे, असे रोहित पवार यांनी या पोस्टमध्ये सुरुवातीलाच म्हटले आहे. कुरुक्षेत्रावरील लढाईपूर्वी दुर्योधन आणि अर्जुन भगवान श्रीकृष्णाला भेटण्यासाठी गेले. त्यावेळी भगवान श्रीकृष्ण झोपले असल्याने त्यांची झोप होईपर्यंत वाट पाहण्याशिवाय या दोघांकडे पर्याय नव्हता. दुर्योधनाच्या मनात खच्चून अहंकार भरलेला असल्याने तो भगवान श्रीकृष्णाच्या पायाजवळ न बसता उशाजवळ बसला. पण अंगी कमालीची नम्रता असल्याने अर्जुन भगवान श्रीकृष्णाच्या पायाशी बसला. भगवान श्रीकृष्णाने झोपेतून डोळे उघडताच त्याला प्रथम पायाशी बसलेला अर्जुन दिसला आणि त्याला विचारलं तुला काय पाहिजे? तेव्हा अर्जुनाने सांगितले तुमचे मार्गदर्शन आणि भगवान श्रीकृष्णाने त्याला होकार दिला, असे पोस्टमध्ये रोहित पवार यांनी नमूद केले आहे. अर्जुनानंतर श्रीकृष्णाची नजर उशाशी बसलेल्या दुर्योधनाकडे गेली असता त्यांनी त्यालाही विचारले तुला काय हवे ? यावेळी अहंकाराने मदमस्त झालेल्या दुर्योधनाने विचार केला की एकट्या श्रीकृष्णाला आपल्या सोबत घेण्याऐवजी त्याची विराट नारायणी सेना घेतलेली कधीही फायदेशीर ठरेल. म्हणून स्वार्थी विचाराच्या दुर्योधनाने भगवान श्रीकृष्णाकडे त्यांची नारायणी सेना मागितली आणि भगवान श्रीकृष्णानेही ती दिली. अखेर एका बाजूला भगवान श्रीकृष्णाचे मार्गदर्शन लाभलेला अर्जुन तर दुसऱ्या बाजूला विराट नारायणी सेना सोबत असलेला दुर्योधन यांच्यात कुरुक्षेत्रावर झालेल्या तुंबळ युद्धात विजय हा अर्जुनाचाच झाला. कारण त्याच्या बाजूने साक्षात भगवान श्रीकृष्ण होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीतही आज हेच घडते, अशा शब्दांत रोहित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची तुलना महाभारतातील प्रसंगाशी केली आहे.

# अंतरिम अर्थसंकल्प: केवळ शब्दांचे मायाजाल

आधुनिक केसरी



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

**सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी नुकत्याच सादर केलेल्या २०२४-२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पात सरकारने प्राप्तिकर आणि अप्रत्यक्ष कर कायम ठेवल्याने करदात्यांचा व त्या दिवशी शेअर बाजाराचा भ्रमनिरास झाला. केंद्र सरकारने सादर केलेला अंतरिम अर्थसंकल्प म्हणजे केवळ शब्दांचे मायाजाल असून त्यात गरीब आणि मध्यमवर्गासाठी काहीही नाही. गेल्या दहा वर्षांत सरकारने अशाचप्रकारे दिलेली किती आश्वासने पूर्ण झाली, हे केंद्र सरकार सांगत नाही. अर्थमंत्री गरीब आणि मध्यमवर्गासाठी नवीन योजना आणतील, त्यांचा त्रास कमी करण्यासाठी काही घोषणा केल्या जातील, सामान्य जनतेला या अपेक्षा होत्या; परंतु तसे काहीच घडले नाही.**

या व्यतिरिक्त, सरकारने अनुसूचित जाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी मोफत कोचिंग योजनेअंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीच्या तरतूदीत १२ कोटी रुपयांपेक्षा अधिक कपात केली आहे; पंतप्रधान जनजातीय विकास मिशन (पीएमजेव्हीएम) साठी - वनोपज बचत गटांसाठी देखील आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या अंदाजाच्या तुलनेत ११० कोटी रुपयांपेक्षा कमी तरतूद करण्यात आहे. तसेच, पीएम आदि-आदर्श ग्राम योजनेसाठी राज्यांना हस्तांतरित करण्यात येणाऱ्या निधीत ४०० कोटी रुपयांची घट झाली आहे. तसेच अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासप्रवर्ग आणि विमुक्तांसाठी उपलब्ध असलेल्या मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांच्या एकूण वाटपात किरकोळ वाढ होईल, याची काळजी घेतली गेली आहे. अन्नधान्य महागाई ७.७ टक्क्यांवर असतानाही अर्थमंत्र्यांनी महागाईच्या मुद्द्याला फारसा हात घातला नाही, तर रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांचे वेतन चार वर्षांपासून स्थिर आहे. ८० कोटी लोकांना मोफत धान्य देण्याविषयी त्या बोलतात; परंतु जागतिक भूक निर्देशांकात भारताचा क्रमांक कितवा आहे किंवा मुलांमधील मोठ्या प्रमाणात कुपोषणाचे प्रमाण वाढले आहे, याबद्दल त्या बोलल्या नाहीत. या अर्थसंकल्पात महिला, तरुण, गरीब आणि शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी अनेक उपक्रमांची घोषणा करून आर्थिक विकास टिकवून ठेवण्यासाठी पायाभूत सुविधांवर ११.११ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त भांडवली खर्चाची तरतूद केल्याचे दिसून येते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एकूण ४७.६६ लाख कोटी रुपयांच्या एकूण खर्चासह २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना सांगितले की, सरकारने १० वर्षांच्या कामाने जनतेचा विश्वास संपादन केला आहे आणि जुलै २०२४ मध्ये आम्ही पुढचा पूर्ण अर्थसंकल्पही सादर करू. त्या असेही म्हणाल्या की, पुढील अर्थसंकल्प विकसित भारताचा रोडमॅप असेल. अंतरिम अर्थसंकल्पात चालू आर्थिक वर्षासाठी खर्चाचा सुधारित अंदाज ४४.९० लाख कोटी रुपये ठेवण्यात आला आहे. चालू आर्थिक वर्षासाठी महसुली प्राप्ती ३०.३० लाख कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे, जो अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा जास्त आहे. सरकारची कर्जे वगळून एकूण प्राप्ती २७.५६ लाख कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे, ज्यात २३.२४ लाख कोटी रुपयांच्या कर प्राप्तीचा समावेश आहे. पुढील आर्थिक वर्षासाठी एकूण खर्च ४७.६६



लाख कोटी रुपये आणि कर्जे वगळून प्राप्ती ३०.८० लाख कोटी रुपये अपेक्षित आहे. २०२४-२५ साठी कर प्राप्ती २६.०२ लाख कोटी रुपये आहे. अंतरिम अर्थसंकल्प २०२४ चे विश्लेषण 'विकसित भारता'च्या संभाव्यतेचे दस्तऐवज म्हणून करण्यात आले आहे! वरील आकडेवारीनुसार आणि गरीब व मध्यम वर्गाविषयीची सरकारची असलेली अनास्था पाहता विकसित भारत अजूनही खूप दूर आहे असेच म्हणावे लागेल. सध्या भारताची एकूण अर्थव्यवस्था ३.७ ट्रिलियन डॉलर आहे. प्रगत राष्ट्रासाठी केवळ अर्थव्यवस्थेचा विकास करणे पुरेसे नाही, तर देशातील जनतेचे राहणीमान, आधुनिक शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान व तांत्रिक सोयी-सुविधा आणि सुधारणा व व्यापक रोजगार इत्यादीमध्ये व्यापक सुधारणा दिसून यायला हव्यात. सध्या शिक्षणावर सरासरी ३.८ टक्के तर आरोग्यावर केवळ १.३ टक्के खर्च होतो. या क्षेत्रांवर जीडीपीच्या ६.६ टक्क्याहून अधिक खर्च व्हायला हवा, असा युक्तिवाद अर्थतज्ज्ञ वारंवार करतात. याशिवाय शेतीचा सरासरी विकासदर केवळ १.८ टक्के राहिला आहे, विशेषतः कोरोना महामारीच्या काळातही तो ३ टक्क्यांहून अधिक होता. आपल्या जीडीपीमध्ये शेतीचा वाटा १८ ते २० टक्के आहे. वास्तविकतः जगातील ५४ प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारत हा एकमेव असा देश आहे जिथे २००० पासून शेतकऱ्यांचे सातत्याने नुकसान होत आहे. अंतरिम अर्थसंकल्पात कृषी
मंत्रालयाला १.२७ लाख कोटी रुपयांपेक्षा थोडी अधिक तरतूद करण्याची घोषणा करण्यात आली आहे. पीक विम्याचे बजेट २.७ टक्क्यांनी, अन्नदाता संरक्षणाचे बजेट २१ टक्क्यांनी, युरिया अनुदानाचे बजेट ७.५ टक्क्यांनी कमी करण्यात आले आहे. शेतकरी आणि शेती हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चार लक्षवेधी क्षेत्रांपैकी एक असूनही सध्याचा काळ हा 'शेतीचा संकटकाळ; असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अर्थमंत्र्यांनी या तरतुदी कमी करण्याचे कारण द्यायला हवे होते. मात्र, भारताचा जीडीपी आणि विकासदर ७ टक्क्यांच्या आसपास असला तरी २०३० पर्यंत आपली अर्थव्यवस्था दुप्पट होऊ शकत नाही. अर्थतज्ज्ञांनी ११-१२ टक्के विकासदर कमी-अधिक प्रमाणात स्थिर असावा, असे विश्लेषण केले आहे. ही गती अशीच राहिली नाही तर ७ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी १० वर्षांहून अधिक काळ लागू शकतो. तर जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याचे समीकरण धोक्यात येऊ शकते. 'विकसित भारताचे स्वप्न गोड आणि सुखद वाटते, त्यावर राजकीय प्रचारही करता येतो, पण आपला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक पाया २०२४ सालापर्यंतचा आहे, त्या दृष्टीने 'विकसित देशा;चे वास्तव सद्या तरी मृगजळच वाटते आहे. खरे तर आपला अर्थसंकल्प तुटीचा आहे. जुलैच्या पूर्ण आणि सर्वसाधारण अर्थसंकल्पातही हीच स्थिती कायम राहू शकते! या अंतरिम अर्थसंकल्पात सामाजिक न्याय आणि आदिवासी व्यवहार मंत्रालयांसाठीची आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत दोन्ही मंत्रालयांच्या अंदाजित तरतूदीत किरकोळ वाढ दिसून आली आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयासाठी १४,२२५ कोटी रुपये, तर आदिवासी कार्य मंत्रालयासाठी पुढील आर्थिक वर्षासाठी १३,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आदिवासी कार्य मंत्रालयाला आपल्या महत्त्वाकांक्षी एकलव्य मॉडेल रेसिडेन्शल स्कूल्स (ईएमआरएस) प्रकल्पावर चालू आर्थिक वर्षासाठी ५,९४३ कोटी रुपयांच्या तरतूदीपैकी केवळ २,४७१.८१ कोटी रुपये खर्च करता आले असले तरी मंत्रालयाने या प्रकल्पासाठी ६,३९९ कोटी रुपये पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी राखून ठेवले आहेत.
नोव्हेंबर २०२३ मध्ये सुरू करण्यात आलेल्या विशेषतः दुर्बल आदिवासी गटांना पीएम-जनमन कार्यक्रमात राज्यांच्या प्रमुखांना हस्तांतरित करण्यासाठी २४०
कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, तर आदिवासी कार्य मंत्रालयांतर्गत केंद्रीय क्षेत्रासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी राज्यघटनेच्या कलम २७५ (१) अन्वये अनुदान म्हणून १६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
देशावरील सुमारे २०० लाख कोटी रुपयांचे कर्ज कसे कमी होईल, याचा खुलासाही अर्थमंत्र्यांनी केला नाही. किंवा त्याच्या देयकाचा अर्थव्यवस्थेवर किती परिणाम होत आहे? अंदाजपत्रकात एकूण खर्च ४४ लाख कोटी रुपयांहून अधिक असेल, तर महसुली प्राप्ती ३२ लाख कोटी रुपयांपेक्षा थोडी अधिक असू शकते. या दोघांमधील तफावत ही वार्षिक तूट असेल.
अर्थमंत्र्यांनी वित्तीय आणि राजकोषीय तुटीचा उल्लेख केला आहे. ते जीडीपीच्या ५ टक्क्यांहून अधिक आहेत, ही अत्यंत चिंताजनक स्थिती आहे. २०२५ पर्यंत ही तूट ४.५ टक्क्यांवर आणण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. हा आर्थिक असमतोल दूर झाला नाही, तर ;विकसित राष्ट्राचे स्वप्न कसे साकार होणार? रोजगार आणि नोकऱ्या या विषयावर अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात मौन बाळगलेले असून बेरोजगारांसाठी कोणताही रोडमॅप नाही. तसेच २०२० ते २०२२ या कालावधीत ३०,००० हून अधिक शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख केलेला नाही किंवा श्रमशक्तीत महिलांचा सहभाग अत्यल्प असल्याने त्यात वाढ कशी होईल याचा रोडमॅपही दिला नाही. एकूणच हा अर्थसंकल्प म्हणजे मूठभर भांवालदारांच्या संपत्तीत अधिक वृद्धी होईल याचीच अधिक काळजी घेतली आहे असे म्हणण्यास वाव आहे! **(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# नवोदय

आधुनिक केसरी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

**संध्याकाळची वेळ होती. साधारणत: आठ वाजले होते. विराट च्या घरचे सगळे टी.व्ही.पाहत पाहत जेवण करत बसले होते. विराटच्या भावाला म्हणजे जय ला पुरणपोळ्या आवडतात म्हणून त्याच्या आईने आज आमरस व पोळ्या केल्या होत्या. विराट चे पप्पा नंतर जेवण करतो म्हणून सोप्यावर काहीतरी लिहीत बसले होते. हे सारे जेवण करत असताना पप्पांना फोन आला. तो फोन विराटच्या शाळेमधून विराटच्या माधव सरांचा होता. पप्पांनी तो फोन उचलला व म्हणाले, " हॅलो, हॅलो..!' " मी विराटच्या शाळेमधून माधव सर बोलतो." " हा नमस्कार सर, बोला, बोला सर" "अहो, सर, तुमचा मुलगा विराट हा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे."**

विराटच्या आजीचे सगळे कार्यक्रम आटपून विराट चे पप्पा विराटच्या परीक्षेसाठी परत निघाले. विराट ची नवोदयची परीक्षा असल्यामुळे जास्त दिवस गावाकडे थांबू शकले नाहीत. परीक्षा दोन-तीन दिवसावर असताना गावाकडून येताना रस्त्यात औरंगाबाद लागले होते. विराट पप्पाला म्हणाला, 'पप्पा, मला नवोदय विद्यालयाचे नवनीत हे पुस्तक घ्यायचे आहे. इथे मिळेल का?' पप्पांनी गाडी बाजूला लावून विराटला पुस्तकाच्या दुकानाकडे घेऊन गेले. नवोदय विद्यालयाची पुस्तके दुकानदाराने विराट समोर ठेवली. त्या पुस्तकाची किंमत पाचशे रुपये होती. विराट म्हणाला," पप्पा हे घ्यायचे का?" त्यावर विराट ची मम्मी म्हणाली, "अरे दोन दिवसांवर परीक्षा आली आहे. दोन दिवसात तु याचा काय अभ्यास करणार आहेस.?" त्यावर विराट चे पप्पा म्हणाले, "अरे असू दे, तुला आवडले असेल तर ते पुस्तक घे. त्या किमतीचा विचार करू नकोस." विराट चे पप्पा ही पुस्तकावर प्रेम करणारे होते. पुस्तकांनीच त्यांना घडवलेलं होतं. त्यामुळे पुस्तकाचे महत्व ते ओळखून होते. म्हणून त्यांनी ते पुस्तक घेतले. पुस्तक घरी आणल्यानंतर विराटने दोन दिवसात त्या पुस्तकाचा चांगला अभ्यास केला. त्यातील प्रश्नपत्रिकाही सोडवल्या. रात्रीच्या बारा वाजेपर्यंत तो त्या पुस्तकाचा अभ्यास करत असे.खरे तर परीक्षा पास झाल्यामुळे त्याच्या मेहतीला फळ मिळाले होते. विराट ची नवोदय विद्यालयात जायची तयारी सुरू झाली होती. त्याचे मित्रही तयार झाले होते. एकमेकांकडे बघून सगळे खुश होते. ते वेगवेगळ्या प्रकारची स्वप्न रंगवत होते. विराटचा फॉर्म शाळेत जमा करायचा होता. त्यासाठी सगळी कागदपत्रे त्यांनी जमा करायला लावली होती. गावाकडे फोन करून विराटच्या काकालाही विराटचे कागदपत्र काढायला लावली होती. त्याचे मेडिकल करण्यासाठीही विराटला त्याचे पप्पा धुळे जिल्ह्याला तपासणी करण्यासाठी घेऊन गेले होते. सिविल सर्जनचे सर्टिफिकेट घेतले होते. त्यासाठीही बराच आटापिटा करावा लागला. कुणी तिकडे पळवत होते तर कोणी इकडे पळवत होते.सगळे कागदपत्र एकदाचे जमा झाले होते. विराटचा फॉर्म देण्यासाठी पुन्हा शाळेत जायचे होते. पुन्हा एकदा आणखी शाळेत येण्यासाठी विराटच्या मम्मीने व त्याच्या छोट्या भावाने म्हणजे जय ने हट्ट धरला. दोघेच गाडीत जाण्यापेक्षा आम्हालाही येऊ द्या. पुन्हा आणखी एकदा शाळा बघता येईल. म्हणून फॉर्म जमा करण्यासाठी सगळेजण निघालो. नुकताच एकदा दोनदा पाऊस पडून गेला होता. जिकडे तिकडे हिरवेगार दिसत होते. मनाला प्रसन्न वाटत होते. शाळेचे वातावरणही खुलून दिसत होते. शाळेतील झाडे हिरवेगारपणा बघून मनाला प्रसन्न वाटत होते. त्यामुळे ती शाळा ही आम्हाला सर्वांना छान वाटली. नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांचे म्हणजे मुलांचे व मुलींचेही वसतिगृह आम्ही बघितले. मुलांची राहण्याची सोय एका मोठ्या हॉलमध्ये रेल्वेतल्या डब्यासारखे सिमेंटचे पलंग टाकले होते. दोघात एक पंखा होता. एका त्या मोठ्या हॉलमध्ये वीस पंचेवीस विद्यार्थी राहत असत. वरही तेवढेच विद्यार्थी राहत असत. हे सारं आम्हाला खिडकीतून बघायला मिळाले. नंतर विराट चा फॉर्म कार्यालयात जमा केला आणि आणि कार्यालयातून त्यांनी बारा जुलैला सर्व सामानासहित व टी.सी काढून घेऊन येण्यासाठी सांगितले. आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. परतीच्या प्रवासात गाडीत चर्चा करता करता विराट ची मम्मी विराटच्या पप्पाला म्हणाली, "का हो, तुम्हाला काय वाटते एकंदरीत हे सगळं बघून." **क्रमशः**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गोवंश हत्या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल; तालुक्यात खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील सांगवी भुसार हद्दीत अवैध रित्या गोवंश जातीची जनावरे काही असामाजिक तत्त्वांनी बाळगली असल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्यास प्राप्त झाली असता त्या नुसार नूतन पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी केलेल्या कारवाईत खाटीकगल्ली, संजयनगर कोपरगाव येथील आरोपी जाकिर हानिफभाई कुरेशी व सांगवी भुसार येथील आरोपी दौलत त्रिंबक गायकवाड यांना २६ गोवंश जातीच्या जनावारांसह पकडले असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे समाधान व्यक्त होत आहे.

गाय ही हिंदू धर्म आणि संस्कृतीचे प्रतिक मानले जाते. त्यामुळे गोवंश हत्या बंदी कायदा लागू करण्याची मागणी सातत्याने होत होती.१९९५ साली युती सरकारच्या काळात गोवंश हत्या बंदी कायद्याचा मसुदा तयार करण्यात आले होता. राज्यात सन-२०१४ साली भाजपचे सरकार आल्यावर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर स्वाक्षरी करून गोवंश बंदी कायदा लागू केला होता.त्या कायद्यानुसार 'गोहत्या' हा दंडनीय अपराध मानला जात आहे.गोहत्या करणाऱ्या गुन्हेगाराला कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.मात्र त्याच्या इतकासा परिणाम कोपरगाव शहर आणि तालुक्यात दिसून येत नाही वारंवार गोवंश हत्येची प्रकरणे उघड होत आहे. माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे यांचे काळात नगरपरिषदेच्या जवळ व पोलिसांच्या नाकाखाली संजयनगर येथे हा उद्योग ऐन शिवरात्रीच्या सुमारास सुरु असल्याचे गंभीर प्रकरण उघड झाले होते.सदर गुन्हा नगर येथील स्थानिक गुन्हे शाखेने उघड केला होता.त्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांनी वारंवार मागणी करूनही या घटकांवर कठोर कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.त्यामुळे हे असामाजिक तत्व चेकाळले असल्याचे दिसून येत आहे.तालुका पोलीस ठाण्याचे नवीन पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी याबाबत सुरुवातीला तरी आपली चमक दाखवली असल्याचे दिसून येत असले तरी हि चमक सातत्याने दिसेल का असा सवाल निर्माण झाला आहे.मागील पोलीस निरीक्षक चमकोगिरी आणि भाषणांसाठी प्रसिद्ध होते.कृतिशून्य अधिकाऱ्यामुळे संजयनगर भागातील अनेक जण या उद्योगात असल्याचे उघड आले होते.येथील गोवंश कत्तल संगमनेर मार्गे थेट मुंबई आणि गुजरात पर्यंत धडकली होती.इतके विशाल रॅकेट असल्याचे उघड झाले होते.विशेष यात काही अधिकारी सामील असल्याचे उघड झाले होते.त्यामुळे हा गंभिर विषय असून अधिकाऱ्यांचे याबाबत कौतुक केले पाहिजे मात्र त्यांनी गुन्हेगारांच्या विरुद्ध कारवाईसाठी सातत्य ठेवणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या कारवाईत ५५ हजार किमतीची २६ गोवंश जातीची वासरे,०३ गोवंश जातीच्या गायी असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

दरम्यान या प्रकरणी फिर्यादी पोलीस कॉ.युवराज खुळे यांनी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन या प्रकरणी आरोपी जाकिर कुरेशी व दौलत गायकवाड याचे विरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात हजर होऊन गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी पथकात तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कोळी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कुसारे,पो.हे.कॉ.संदीप बोटे,पो.कॉ.जयदीप गवारे,राघू कोतकर,नवनाथ गुंजाळ,रमेश झडे,युवराज खुळे,चालक चंद्रकांत मेढे अमोल फंटांगरे,आदिनीं सहभाग नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस हे.कॉ.संदीप बोटे हे करीत आहेत.



# जि.प.म. उच्च प्राथमिक शाळा तिवडीचे वार्षिक स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तालुक्यातील तिवडी येथे ७ जानेवारी रोजी जि.प.म.उच्च प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन थाटामाटात संपन्न झाले.

रमाई जयंती निमित्त रमाबाईच्या प्रतीमेचे पुजन करून स्नेहसंमेलनाला सुरवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्ती,लोकगीत,हिंदी, मराठी चित्रपटातील विविध गीतांवर नृत्य सादर केले.काही मुलामुलींनी राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, छत्रपती शिवाजी महाराजाच्या वेशभूषेत केलेली कलाकृती स्नेहसंमेलनात आकर्षक ठरली.ओ शेट तुम्ही आनंदच केलाय थेट या गीतावर केलेल्या नृत्याने स्नेहसंमेलनाला उपस्थित असलेल्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब यांच्या गीतांवर झालेले नृत्य कार्यक्रमाचे आकर्षक ठरले.

यावेळी तिवडी गावचे युवा सरपंच लहू झालटे, ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष निवास गई, मुख्याध्यापक गुंड,सहा.शिक्षक धोटे ,धनवे ,शेगोकार,मेश्राम मॅडम,पहुरकर,घुळे सर याचेसह विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी व तिवडी आणि गौलखेडचे महिला व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर हजर होते.

# समृद्धी महामार्गाच्या उपरस्त्यांसाठी निधी : आ. काळे

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** मतदार संघातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गामुळे खराब झालेल्या उप रस्त्यांचा (सेवा मार्ग) प्रश्न मार्गी लागला असून कोपरगाव तालुक्यातील जवळपास २६ किलोमीटर रस्त्यांसाठी महायुती शासनाने तब्बल ५२ कोटी निधी मंजूर केला असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली असली तरी अद्याप नैसर्गिक जल प्रवाहासांठी मार्गिका काढण्यास सरकार तयार असल्याचे दिसत नाही.

राज्य सरकारचा महत्वाकांक्षी समजला जाणारा नागपूर-ते मुंबई हा समृद्धी महामार्ग या दोन शहरांचा प्रवासाचा कालावधी कमी करण्यासाठी महत्वपूर्ण समजला जातो. तो कोपरगाव तालुक्यातून गेला असून या समृद्धी महामार्गाचे मागील वर्षी दोन टप्प्यात लोकार्पण होवून हा समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला झाला होता तर अद्याप एक शेवटचा टप्पा बाकी आहे. मात्र या समृद्धी महामार्गाच्या निर्मितीसाठी सिन्नर तालुक्यातील सायाळे कोपरगाव तालुक्यातील संवत्सर, कोकमठाण,धोत्रे, भोजडे, खोपडी, लौकी, कान्हेगाव, जेऊर कुंभारी, डाऊच, घारी, देर्डे, पोहेगाव आदी गावातील ज्या रस्त्यांचा वापर करण्यात आला होता त्यापैकी अनेक रस्त्यांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र नजीकच्या शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी मार्गच नव्हता.या प्रश्नी सर्व प्रथम सिन्नर तालुक्यातील सायाळे येथील कार्यकर्ते डॉ.विजय शिंदे यांनी लक्ष वेधले होते व त्यासाठी सायाळे हद्दीत सर्व प्रथम समृद्धी महामार्ग अडवला होता. त्यावेळी रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी या सेवा मार्गाबाबत सर्व प्रथम आश्वासन दिले होते.

अद्यापही या मार्गामुळे नैसर्गिक प्रवाह अडवले गेले असून त्यांना मार्ग काढून देण्याचे काम महामंडळाने केलेलं नाही. त्याकडे आ.काळे यांनी लक्ष घालणे गरजेचे बनले आहे. कोपरगाव तालुक्यातही हीच स्थिती होती.

दरम्यान खराब उपरस्त्यांमुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची आ.काळे यांनी दखल घेवून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाचे प्रमुख अधिकारी, समृद्धी महामार्ग ठेकेदार व कार्यकर्त्यां समवेत रस्त्यांबाबत संवत्सर, कोकमठाण, धोत्रे, भोजडे, खोपडी, लौकी, कान्हेगाव, जेऊर कुंभारी, डाऊच, घारी, देर्डे, पोहेगाव आदी गावातील रस्त्यांची समक्ष पाहणी केली होती. नागरिकांना येत असलेल्या अडचणी सोडवून हे सर्व रस्ते पूर्ववत करून देण्याच्या त्यांनी सूचना केल्या होत्या. त्यावेळी बहुतांश रस्त्यांची दुरुस्ती झाली होती मात्र ज्या रस्त्यांची दुरुस्ती अद्याप बाकी होती.

त्या रस्त्यांची लवकरात लवकर दुरुस्ती व्हावी यासाठी निधी मिळावा याबाबत त्यांनी शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केला असल्याचा दावा केला आहे. त्याची दखल महायुती शासनाने घेतली असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या एकूण २६ किलोमीटर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ५२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. लवकरच या रस्त्यांच्या कामांना प्रारंभ होणार आहे त्यामुळे कोपरगाव तालुक्यातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शेवगाव येथे जगद्गुरू नरेन्द्राचार्यजी महाराज पादुका दर्शन सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** अनंत श्री विभूषित जगद्गुरु श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज दक्षिण पीठ नाणीजधाम यांचा पादुका दर्शन व प्रवचन सोहळा शेवगाव येथील खंडोबा मैदानावर सोमवार दि.५ फेब्रूवारी रोजी मोठ्या उत्साहात हजारो भक्तगणांचे उपस्थितीत संपन्न झाला. भारतीय धर्म, संस्कृती, परंपरा व थोर संतांनी दिलेली शिकवण याची माहिती जनसामान्यांना करून देणे व हिंदू धर्माची जोपासना व ओढ निर्माण करण्यासाठी असे कार्यक्रम केले जातात अशी माहिती अहमदनगर दक्षिण जिल्हा संप्रयदायाचे जिल्हा निरीक्षक घोगरे यांनी दिली. भव्य शोभायात्रेने या कार्यक्रमाची सुरुवात झाली मध्ये प्रभू रामचंद्र, सीतामाई, लक्ष्मणजी तसेच शेगावीचे संत गजानन महाराज असे विविध प्रकारचे देखावे तयार करण्यात आले होते. या शोभायात्रेचे शुभागमन वाजत गाजत



कार्यक्रमाच्या ठिकाणी झाले. या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थितीत स्वच्छता अभियान अंतर्गत टॉयलेट व्हॅनची चावी संस्थान साठी कार्यक्रम दौरा प्रमुख उदय रानभरे यांचेकडे देण्यात आली. कार्यक्रमात संस्थानच्या प्रवचनकार सौ. बाबरताई यांचे अतिशय सुंदर असे अमृततुल्य प्रवचन संपन्न झाले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित भक्तगणांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नाशिक पीठ कार्याध्यक्ष प्रवीण ठाकूर, जिल्हा अध्यक्ष सागर तिखे, महिला अध्यक्ष छायाताई ठाकरे, विभागीय निरीक्षक पांढरे ताई, सुरेश राऊत तालुकाध्यक्ष भिमराव साखरे, कांताताई दळे, शेवगाव तालुक्यातील भक्तगण यांच्यासह अहमदनगर जिल्ह्यातील सर्व समितीच्या सर्व पदाधिकारी व भक्तगण यांनी विशेष परिश्रम घेतले.



# लोहगड नांद्रा येथे विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लोहगड नांद्रा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार मा. श्री. हरीभाऊजी बागडे नाना व माजी राज्यसभा खासदार डॉ. विकास महात्मे साहेब त्यांच्या धर्मपत्नी डॉ. सुनिता विकास महात्मे यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. लोहगड नांद्रा येथील लोहगडावर सामाजिक सभागृह, गावातील अहिल्याबाई होळकर सभागृह व त्या परिसरात पेव्हर ब्लॉक चे काम, विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे सभागृह, लिंगायत वाणी समाजाचे सभागृह आदी कामाचे लोकार्पण व भूमिपूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाठ, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अनुराधाताई चव्हाण, जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्याताई अभिषेक गाडेकर, अरुण रोडगे, रंगनाथ राठोड, सर्जेराव मेटे, आप्पासाहेब काकडे, सारंग गाडेकर, अभिषेक गाडेकर, सांडू राठोड, खेमचंद राठोड, सुरेश आप्पा गवंडर, राजू गवंडर, शेखु बोडखे, विलास दानवे, नामदेव मानकापे, शेषराव दानवे, निवृत्ती तरटे आदींसह भाजपा पदाधिकारी - कार्यकर्ते, धनगर समाज संघर्ष समितीचे पदाधिकारी,परिसरातील सरपंच, उपसरपंच, सदस्य, चेअरमन, व्हॉईस चेअरमन, फुलंब्री बांधकाम विभागाचे अभियंता राजकुमार हेलाले गावकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# पोलीसासह माजी सभापतींना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न

## शासकीय कामात अडथळा व दंगलीचे गुन्हे

आधुनिक केसरी न्यूज



**पहूर :** रास्ता रोको आंदोलनाला हिंसक वळण लागल्याने यात पोलीस कर्मचारी गोपाळ माळी व माजी पंचायत समिती सभापती यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न झाला असल्याच्या आशयाखाली फिर्याद पहूर पोलीसात दाखल झाली आहे. याप्रकरणी तीन पदाधिकाऱ्यांसह इतर पन्नास ते शंभर जणां विरुद्ध दंगल, जिवे ठार मारणे व शासकीय कामात अडथळा असा स्वरूपात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आंदोलनाचे व्हिडीओ चित्रीकरण पोलीस कर्मचारी गोपाळ माळी करीत असतांना मारहाण करून मोबाईल फोडला असे फिर्यादीत म्हटले आहे. गोपाळ माळी यांच्या फिर्यादीवरून आंदोलन कर्ते चेतन करतार जाधव ( ३८ ) यांच्या सह शंभर ते दीडशे आंदोलकांवर शासकीय कामात अडथळा, जिवे ठार मारण्याचा प्रयत्न, दंगल, मारहाण, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान असा स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पंचायत समिती माजी सभापती बाबुराव घोंगडे यांनी हि फिर्याद दाखल करून याप्रकरणात आत्माराम जाधव (५५), विजय राठोड (४०) अमरसिंग राठोड(४५) यांच्या सह दहाते- पंधरा आंदोलन कर्त्यांवर जिवे ठार मारणे, गाडीचे नुकसान, दंगल व मारहाण असा स्वरुपाचा दुसरा ही गुन्हा दाखल केला असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांची लूट

## संबंधितावर फौजदारी गुन्हे करा 'शेकाप'ची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**गडचिरोली :** ४० किलो ६०० ग्रॅम प्रती गोणी वजनाप्रमाणे धान खरेदी करण्याचे शासनाचे धोरण असताना ओलाव्याच्या नावाखाली ४२ ते ४३ किलोची खरेदी करून जिल्हाभरातील खरेदी केंद्रांवर ८ कोटी रुपयांपेक्षा अधिकची लूट शेतकऱ्यांकडून करण्यात आली. शेतकऱ्यांना लूटणाऱ्यांविरोधात शहानिशा करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते रामदास जराते यांनी केली आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीत रामदास जराते यांनी म्हटले आहे की, शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ आणि मार्केटिंग फेडरेशनमार्फत शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात येते.

सध्या आदिवासी विकास महामंडळाचे ९३ आणि मार्केटिंग फेडरेशनचे २१ असे साधारणतः ११४ खरेदी केंद्रांवर ही धान खरेदी सुरू असून आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांची मुस्कटदाबी करून लुट करण्यात येत आहे. शासन नियमाप्रमाणे खरेतर एका गोणी (पोते) मध्ये ४० किलो ६०० ग्रॅम वजनापेक्षा अधिक धानाची खरेदी करता येत नाही. मात्र, जिल्हाभरातील सर्व धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांकडून ४२ ते ४३ किलो



प्रती गोणी (पोते) वजनाने शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकाराबद्दल शेतकरी जेव्हा विचारणा करतात तेव्हा, हे अधिकचे वजन ओलाव्याचे म्हणून घेण्यात येत आहेत असे उत्तर दिले जात आहेत. मात्र, एका गोणी (पोते) मध्ये ४० किलो ६०० ग्रॅम वजनातून शासन खरेदी केंद्र किंवा अभिकर्ता संस्थांकडून ओलाव्याची तुट गृहित धरून ३८ किलो ५०० ग्रॅम वजन धानाचीच उचल करीत असल्याने शेतकऱ्यांकडून ४२ ते ४३ किलो प्रती गोणी (पोते) वजनाने केली जात असलेली खरेदी ही शुद्ध लूट आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १० लाख क्विंटलपेक्षा अधिकची धान खरेदी करण्यात आलेली असूनयातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांची ८ कोटीपेक्षा जास्त रुपयांची खरेदी केंद्रांवर अधिकचा धान प्रति पोत्यामागे घेऊन लूट करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक खरेदी केंद्रांवर आपली खास पथके पाठवून व पोत्यांमध्ये खरेदी केलेल्या धानाच्या वजनाची तपासणी केली जावून या महालुटीची शहानिशा करण्यात यावी व दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावे. अधिकच्या खरेदीची रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देण्यात यावी, अशी मागणीही रामदास जराते यांनी केली आहे.



# पैठणमध्ये राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी फटाके फोडून केला आनंद साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हे चिन्ह आणि पक्षाची सूत्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना दिल्याने पैठण शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतिने फटाके फोडून आंनद साजरा करण्यात आला यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष जितुभाऊ परदेशी, युवक शहराध्यक्ष इरफान बागवान, माजी नगरसेवक बंजरग लिबोरे, माजी नगरसेवक ज्ञानेश घोडके, तोफिक धाडे, महेंद्र साळवे,व पैठण शहर राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त उपस्थित होते.

# प्रभाग क्रमांक २ मधील रखडलेले विकास कामे करावे : सामाजिक कार्यकर्ते पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील प्रभाग कमांक २ मधील रस्ते नाली विविध विकास कामाची मुख्यअधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून ती कामे तात्काळ करावी, असे निवेदन सामाजीक कार्यकर्ते संतोष पवार यांनी नगर परीषदकडे निवेदन दिले असुन प्रभाग २ मध्ये गेल्या १५ वर्षापासून रस्ता व नाली काम झालेले नाही आमच्या परिसरातील अहिरे काका , तलाठी चव्हाण ते नंदू गजलेश्वर ते गजानन पॉइंट या ठिकाणी या प्रभागातील लहान मुले सकाळी साने गुरुजी विद्यालय व सावित्री बाई फुले विद्यालय शाळेत जातात. वाहने जातांना त्रास होत आहे. आपण जातीने लक्ष घालून सदरील पॉइंट बघून समक्ष पाहणी करून मार्ग काढावा व रस्ते नाली विकास कामे तात्काळ करावी अन्यथा आपल्या कार्यालय समोर स्थानिक नागरिकांना घेवून आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा ही त्यांनी निवेदनात दिला आहे.

# सोयगाव तालुक्यात मोफत धान्य घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आता होणार कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात आता शासकीय नोकरीवर असतानादेखील स्वस्त धान्य दुकानातून मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या शासकीय कर्मचा-यांवर आता चेट कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना दिली. याचा सोयगाव तालुक्यात लवकरच सर्व्हे करण्यात येणार असून मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यात येणार आहे.शासनाकडून धान्य वाटपात अंत्योदय, अन्न सुरक्षा व शेतकरी असे तीन विभागण्या करण्यात आलेल्या आहे. यात अंत्योदय यांना मोफत, अन सुरक्षेत चार-पाच रुपये किलोने धान्य दिले जाते. तर शेतकरी योजनेत थेट खात्यावर रकम जमा केली जाते. सध्या अंत्योदय व अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून मोफत धान्य दिले जात दुकाने आहेत. या योजनेचा लाभ अनेक शासकीय कर्मचारी घेत असल्याचे समोर आले आहे. यामुळे अनेक गरजू लाभार्थी बंचित राहत आहे. गरजू लाभार्थ्यांना धान्य मिळावे म्हणून आता मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन कारवाई करण्यात येणार आहे.असल्याची माहिती सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली. शिधापत्रिकाधारक आहेत. यात अंत्योदयाचे शिधापत्रिकाधारक असून नागरिकांना मोफत धान्य मिळते. अन्न सुरक्षा योजनेत शिधापत्रिकाधारक असून लाभ नागरिकांना मिळतो. शेतकरीमध्ये (एपीएल) कुटुंबांचा समावेश असून नागरिकांना याचा तालुक्यात स्वस्त धान्य लाभ मिळतो. सध्या केंद्र शासनाकडून अंत्योदय व अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना मोफत धान्य दिले जात असल्याने तालुक्यातील शिधापत्रिकाधारकातील नागरिकांना याचा लाभ मिळत आहे.२०१८ ला काही कर्मचाऱ्यांनी हक सोडला होता, मात्र अद्यापही अनेक कर्मचारी मोफत धान्याचा लाभ घेत आहे. अशा कर्मचाऱ्यांची संख्या सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात तालुक्यात मोठी असल्याचे बोलले जात आहे. असे कर्मचारी किती ? हे सर्वे नंतरच समोर येणार असल्याची माहिती सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे.



> सोयगाव तालुक्यात अनेक शासकीय कर्मचारी शासनाच्या मोफत धान्याचा लाभ घेत आहे . यामुळे गरजू लाभार्थी वंचित राहत आहे . याचा लवकरच सर्व्हे करण्यात येणार असून लाभ घेतलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांव कारवाई करण्यात येणार आहे . लाभ घेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी तातडीने पुरवठा विभागाशी संपर्क साधून हक सोडावा .
> **नाना मोरे नायब तहसीलदार, पुरवठा अधिकारी सोयगाव**



# धनगर एसटी आरक्षणाचे प्रमाणपत्र घेण्यासाठी समाज बांधवांनी एकत्र यावे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** धनगर समाज एसटी आरक्षण अंमलबजावणी करण्यासाठी धनगर समाज हा वेळोवेळी आंदोलन रस्ता रोको उपोषण करत आहे या अनुषंगाने धनगर समाज एसटी आरक्षणाची अंमलबजावणी या सरकारने लवकर करून धनगर समाजाच्या लेकरांच्या हातामध्ये एसटीचा दाखला द्यावा यासाठीगावोगावी धनगर समाजाच्या घोंगडी बैठका प्रकाश भैय्या सोनसळे अध्यक्ष धनगर समाज संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक गावात बैठका होत आहेत. गेले अनेक दिवसाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी धनगर समाज एसटी आरक्षणासाठी वेळोवेळी झगडत आहे परंतु या धनगर एसटी आरक्षणाची आतापर्यंत मागणी पूर्ण झाली नाही वाडी वस्ती तांडा खेडोपाड्यातील गाव गड्यातील युवकांनी व समाज बांधवांनी एकत्र येऊन धनगर एसटी आरक्षणाचा लढा हा महाराष्ट्रभर पेटून धनगर एसटी आरक्षणाचा धागा झाला पाहिजे जेणेकरून आपले युवक आरक्षण एसटी आरक्षण नसल्यामुळे बेरोजगार झाले आहेत जर आपल्याला या शासनाने एसटीचे आरक्षण अंमलबजावणी जर केली तर आपले हजारो विद्यार्थी विद्यार्थिनी अधिकारी होतील यासाठी समाज बांधवांनी तुमचे गट गट बाजूला ठेवून या धनगर एसटी आरक्षण लढ्यामध्ये सामील झाले पाहिजे असे धनगर समाजाचे संघटनेचे अध्यक्ष प्रकाश सोनसळे यांनी समाज बांधवांशी बोलताना सांगितले. आपल्याला धनगर एसटी आरक्षण पदरात पाडून घेण्याची, हीच वेळ आहे एसटीचे दाखले हातात घेण्याची यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. राज्य सरकारने महाराष्ट्रातील धनगर एसटी आरक्षणाची दखल घेऊन धनगर समाजाच्या मागणीला न्याय द्यावा. पाटोदा तालुक्यातील उखंडा, लिंबादेवी, भोंडवे वस्ती, पंचक्रोशीतील रोहतवाडी बेदरवाडी, वरझडी, निरगुडी धस पिंपळगाव, घुमरा पारगाव, पाचेगाव, दासखेड, या ठिकाणचे समाज बांधव हे देखील या घोंगडी बैठकीमध्ये सहभागी झाले होते. यावेळी प्रकाश भैय्या सोनसळे (अध्यक्ष धनगर समाज संघटना महाराष्ट्र)दत्तात्रय किवणे सरपंच, श्याम गाडेकर धनगर समाज संघटना युवक जिल्हा उपाध्यक्ष ,गोविंद गोचाडे व्याख्याते, रामहरी सोनसळे, देवकते मधुकर,अरुण काकडे तालुका अध्यक्ष पाटोदा, नारायण महानोर सरपंच ,संजय भोंडवे कोषाध्यक्ष पाटोदा, विठ्ठल कोकाटे,पांडुरंग तागड सरपंच, सयाजी लोकरे युवा नेते, राजेंद्र काकडे सरपंच,सूर्यकांत कोकाटे, पत्रकार शरद शेजुळ , शिवाजी डफाळ माजी सरपंच, रवी माने ग्रामपंचायत सदस्य ,प्रतापगिरे ग्रामपंचायत सदस्य, रामदास तागड ग्रामपंचायत सदस्य, सोमनाथ कुडवान, शिवलिंग प्रभाळे, किसन गोदाजी सदर ग्रामपंचायत सदस्य, हनुमान राहिंज, विजय काशीद, मल्हारी बंडगर, परशुराम सापणकर राजेंद्र काशीद, राजेंद्र महानोर, माऊली सोनसळे, सोनाजी किवणे, युवराज मखर, डॉ.खिलारे साहेब, श्रीनिवास सदगर, अभिषेक राहिंज, अभिषेक पोकळे, कुष्णा हजारे, बाळासाहेब हजारे, शुभम लांडे, सुरज भावले, खंडागळे भैय्या, मंगेश ठोसर, किंचक लोखंडे, आकाश चव्हाण, बाबुराव भोंडवे, रामनाथ डोळस, सतिष साबळे, संदिप शिंदे, विलास चव्हाण, बाळु लोखंडे अमोल भोंडवे तालुका अध्यक्ष धनगर समाज संघटना पाटोदा, केशव भोंडवे उपसरपंच, सुरेश वादगे यांचेसह भोंडवे वस्ती, पिठ्ठी ग्रामस्थ, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशी कट्ट्यातून गोळी झाडून युवकाची हत्या


## वाहनाचा कट लागल्याने झाला वाद : आरोपी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** वाहनाचा कट लागल्याच्या कारणावरुन देशी कट्ट्यातून गोळी झाडून युवकाची हत्या करण्यात आली. यावेळी संतप्त जमावाने आरोपीची दुचाकी जाळली. ही घटना यवतमाळ शहरातील कळंब चौकात मंगळवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

शादाब खान रफीक खान रा. तायडे नगर असे मृतकाचे नाव आहे. तर मनिष सागर शेंद्रे रा. सेजल रसिडन्सी, अंबिका नगर यवतमाळ असे आरोपीचे नाव आहे. दिनांक ६ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजता दरम्यान पोलीस स्टेशन यवतमाळ शहर हद्दीतील R.T.O. ऑफीस चौकातुन कळंब चौक परिसरात आरोपी मनिष सागर शेंद्रे रा. सेजल रसिडन्सी, अंबिका नगर यवतमाळ हा त्याच्या मैत्रीण सोबत जात होता. यातील मृतक शादाब खान रफीक खान यास वाहनाचा कट लागला. त्यामुळे आरोपी व मृतक यांच्या मध्ये वाद झाला. त्यानंतर आरोपी हा त्याचे घरी जाउन देशी कट्टा घेउन परत कळंब चौक येथे आला. त्याच्या पाठोपाठ त्याची मैत्रीणसुध्दा आली. यावेही आरोपीने तुम्ही मला व माझा मैत्रीणीला शिवीगाळ का केली असा मृतक यास जाब विचारला. तेव्हा मृतक व आरोपी यांचेमध्ये वाद झाला. आरोपी मनिष शेंद्रे याने त्याचे जवळची देशी कट्टाने मृतक याचेवर गोळी झाडली. त्यामध्ये मृतक नामे शादाब खान रफीक खान याच्या छातील गोळी लागली. यावेळी शादाब याला शासकीय रूग्णालय यवतमाळ येथे भरती करण्यात आले. मात्र उपचार दरम्यान शादाब खान याचा मृत्यू झाला. तक्रारदार पो.स्टे. ला हजर आल्याने तक्रार नोंदवुन गुन्हा दाखल करण्यात येत असुन आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. पवन बन्सोड, अप्पर पोलीस अधिक्षक पियूष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पुज्जलवार, स्थानिक गुन्हे शाखेचे आधारसिंग सोनोने, अवधूतवाडीचे ठाणेदार ज्ञानोबा देवकते, शहरचे ठाणेदार सतिश चवरे यांनी घटनास्थळ गाठले. यावेळी संतप्त नागरिकांनी आरोपीची दुचाकी पेटवुन दिली. शहरात अनुचित प्रकार घडु नये म्हणून दंगल नियंत्रण सुरक्षा पथकाला पाचारण करण्यात आले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल होण्याची प्रक्रीया रात्री उशिरा पर्यंत सुरु होती. परिसरामध्ये शांतता असुन पोलीस स्टेशन हद्दीमध्ये फिक्स पॉईट व अतिरीक्त बंदोबस्त नेमण्यात आले आहे. सदर घटनेसंबधाने कोणत्याही अफवार विश्वास ठेउ नये असे आवाहन शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सतीश चवरे यांनी केले आहे.



# प्रेमसंबंधातून गळा आवळून महिलेचा खून

## पाहुण्याने काढला काटा

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** प्रेमप्रकरणातून कुटुंबात ताण तणाव निर्माण होत असल्याने युवकाने तिचा दुपट्टयाने गळा आवळून महिलेचा खुन केला. ही घटना कळंब पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणा-या  शरद या गावात घडली ५ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या गुन्ह्याचा उलगडा करुन आरोपीला जेरबंद केले.

निर्मला पारनु कोरझर वय ५० वर्षे, रा. शरद असे मृतक महिलेचे नाव आहे. तर रामचंद्र रमेश आत्राम वय ३२ वर्षे, रा. मोहदरी ता. कळंब आरोपीचे नाव आहे. आरोपीचा भाउ रामभाऊ रमेश आत्राम व मृतक हिचे प्रमसंबंध होते. त्यामुळे भावाचे कुटुंबात तानतनाव सुरु होता. त्यामुळे त्याने निर्मलाचा काटा काढायचे ठरवले. सदर महिला नातेवाईक असल्याने ५ फेब्रुवारी रोजी रविवारी रात्री तीच्या घरी पाहुणा म्हणून गेला. त्यानंतर रात्रीच्या सुमारास तिचा दुपट्टयाने गळा आवळुन खुन केला. अंगावरील दागीने घेवून पळुन गेला. ५  फेब्रुवारी रोजी सकाळी निर्माला कोरझर हीला गोरजा आत्राम हीने आवाज देवूनही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे दरवाजा तोडून आत प्रवेश केल्याने ही घटना उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच कळंब पोलिसांनी घटनास्थळ गाठुन पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. फिर्यादी गोरजा महादेव आत्राम रा. शरद यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कळंब पोलिसांनी अज्ञात आरोपी खुनाचा विरुद्ध गुन्हा दाखल केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासचक्रे फिरवुन घाटंजी येथील आनंदनगर झोपडपट्टी येथे राहणारे मामाकडे जावुन आरोपीला जेरबंद केले. मृतक महिलेचे भावासोबत प्रेमसबंध असल्याने कुटुंबात तानतनाव सुरु होता. त्यामुळे सदर महिलेचा गळा आवळुन खुन केल्याची कबुली आरोपीने दिली. आरोपीला पुढील तपासकामी पोलीस ठाणे कळंब यांचे स्वाधीन केले आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, यांच्या मार्गदर्शनात पालीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने, सपोनि विवेक देशमुख, पोउपनि धनराज हाके, पालोस अंमलदार बंडु डांगे, संयद साजीद, अजय डोळे, रुपेश पाली, ऋतुराज मेडवे, धनंजय श्रीरामे, चालक योगेश टेकाम, सागर भारस्कर, मंगेश ढबाले यांनी केली.

# तुरीची गंजी आगीच्या भक्ष्यस्थानी; शेतकऱ्याचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** नजीकच्या सवड शेतशिवारातील सर्व्हे नंबर ८७ मधील कापणी केलेली तुरीची गंजी आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली आहे. परिणामी शेतकऱ्याचे नुकसान झाले असून, सबंधित तलाठ्यांनी पंचनामा सुद्धा केला असल्याची माहिती नुकसानग्रस्तांनी दिली आहे. त्या अनुषंगाने झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी अशी मागणी संबंधीत शेतकऱ्याने केली आहे. प्राप्त माहितीनुसार सवड शेतशिवारात भिमराव रामभाऊ चऱ्हाटे व त्यांचे बंधू गोपीचंद चऱ्हाटे यांची सर्व्हे नंबर ८७ मधे सामायिक शेत आहे. सदर शेतकऱ्याने आपल्या शेतमधील तुरीच्या पिकाची कापणी करून गंजी लावली व संध्याकाळी सात वाजताच्या दरम्यान ते शेतातून घरी आले होते. परंतू ५ फेब्रुवारी रोजी जेंव्हा ते शेतात गेले असता त्यांना तुरीची गंजी आगीच्या भक्ष्यस्थानी पडून खाक झाली असल्याचे दिसुन आले. या घटनेची माहिती त्यांनी सबंधित तलाठ्याला दिली. त्यांच्या माहितीनुसार संबंधीत तलाठ्यानी झालेल्या नुकसानीचा पंचनामा सुद्धा केला असल्याचे नुकसानग्रस्त शेतकऱ्याकडून सांगण्यात येत असून एक लाखापेक्षा जास्त नुकसान झाले असल्याचे सुद्धा सदर शेतकऱ्याचे म्हणणे आहे.

> "शेती हाच माझा मुख्य आधार असून, मी कर्जबाजारी सुद्धा आहे . पहिलेच आर्थिकस्थिती खालावलेली आहे . आणि त्यातच तुरीची गंजी जळून खाक झाली आहे . तुरीच्या भरवशावर घेतलेले कर्ज आणि पुढील शेतमाल हाती येईपर्यंतचा घरप्रपंच कसा भागवायाचा हा बिकट प्रसंग माझ्यावर ओढवला आहे . त्या अनुषंगाने शासनाने मला नुकसाभरपाईची आथिर्क मदत द्यावी अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे .
> भिमराव रामभाऊ चऱ्हाटे,  ( नुकसानग्रस्त शेतकरी )



# डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे अर्भकाचा मृत्यू; पोलीसात तक्रार दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात काही खाजगी डॉक्टरांनी आपले दवाखाने अनाधिकृत रित्या थाटून  रुग्णांवर चुकीचा उपचार करीत आहेत. मंगळवारी ता.( सहा ) एका खाजगी रुग्णालयात ऊपचारा दरम्यान  डॉक्टराच्या  हलगर्जीपणामुळे नवजात अर्भकाचा मृत्यु झाल्याने पोलिसात तक्रार देण्यात आली आहे.

याबाबत अधिकचे माहिती अशी की, तक्रारदार  परसराम बोईनवाड यांनी पत्नी अन्नपूर्णा हीस येथील सरस्वती हॉस्पिटल येथे प्रसूतीसाठी मंगळवारी  सकाळी १०.०० वाजता दाखल केले होते.येथील डॉक्टर सौ मनीषा देशमुख माने यांनी दिवसभर 'त्या' गरोदर मातेस रुग्णालयात थांबवून प्रस्तुती नॉर्मल होईल असे सांगून ताटकळत ठेवले. गरोदर  महिलेस अधिकचा त्रास होत असल्याने नजीकच्या संजीवनी हॉस्पिटल येथे दाखल केले. तेथील डॉक्टरांनी सोनोग्राफी केल्यानंतर बाळाचा गर्भातच मृत्यु झाल्याचे  डॉक्टरांनी सांगीतले. नातेवाईकांच्या परवानगीनंतर बाळास बाहेर काढून महीलेस जीवदान दिले.दरम्यान सरस्वती रुग्णालयाच्या डॉक्टर मनीषा माने यांनी योग्य उपचार दिले नाहीत. वेळीच योग्य उपचार व दुसऱ्या रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला नसल्यामुळेच बाळाचा मृत्यू झाला असा पतीने आरोप केला आहे पोलिसांनी तक्रार दाखल करून तपास सुरू केला आहे.अर्भकाच्या मृत्यूचे वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर डॉक्टर विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

भोकर शहरातील काही खाजगी दवाखाने अनाधिकृत चालत असून नियमबाह्य कारभार केले जातात शासनाच्या विविध परवानग्या त्यांच्याकडे नाहीत आंतर रुग्ण विभागात वेळ अधिक लावले जातात रुग्णाकडून अधिक फीस घेतली जाते त्यांना पावती दिली जात नाही शासनाचा कर बुडविल्या जातो रुग्णाकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उघडले जातात या सर्व अनधिकृत कारभाराची चौकशी करावी अशी मागणी रिपाईचे मनोज शिंदे यांनी  केली होती परंतु प्रशासनाने या तक्रारीची दखल न घेतल्यामुळे खाजगी डॉक्टरांचा मनमानी कारभार चालू आहे नुकतेच गंभीर प्रकरण समोर आले आहे या निमित्ताने तरी खाजगी दवाखान्यांची चौकशी होईल काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# खुलताबाद तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आ. प्रशांत बंब साहेब, प्रदेश कार्यकारणी सदस्य किशोर आबा धनायत  युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, जिल्हा सरचिटणीस एल जी.गायकवाड, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश सोहळा संपन्न झाला. यशोदा लॉन्समध्ये भारतीय जनता पार्टी विविध गावातील कार्यकर्त्यांचा भाजपा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला यामध्ये सराई, सालुखेडा, सोनखेडा, घोडेगाव गोळेगाव गदाना, वडोद, ममनापूर, येसगाव न1, बाजार सावंगी झरी, बोडखा, दरेगाव सोबलगाव, लोणी, टाकळी  धामणगाव, लामणगाव, ताजनापुर, गंधेश्वर, मावसाळा, कनकशिळ, इंदापूर, रेल, वेरूळ गल्लेबोरगाव, निरगुडी, पिंपरी कसाबखेडा, तिसगाव तांडा, तिसगाव ,शार्दुलवाडी, अशा विविध गावातील



शेकडो कार्यकर्त्यांनी कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. आ. प्रशांत बंब म्हणाले की नरेंद्र मोदी सारख एक चांगलं नेतृत्व या देशाला मिळाले आहे. महाराष्ट्र सरकारने देखील अनेक लोक हिताचे निर्णय जनतेसाठी घेतले आहे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी नेण्याचा माझा मानस असून त्याची सुरुवात मी नुकतीच गंगापूर तालुक्यामध्ये केलेली आहे, चाळीस गावातील तीस हजार हेक्टर शेतीला बंद पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा योजना मंजूर करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केलेली आहे. त्याचप्रमाणे राहिलेले गंगापूर तालुक्यातील इतर गावे व खुलताबाद तालुका मार्च 2025 पर्यंत पाणी आणण्याचा माझा संकल्प आहे.

खुलताबाद तालुक्यातील प्रत्येक गावात, वाडी, वस्ती, तांड्यावर आमदार निधी व 25/ 15 या योजनेच्या माध्यमातून गावागावात निधीचे वाटप करण्यात आलेले आहे तसेच मोठमोठी रस्ते, पूल यांचे कामे प्रगतीपथावर आहे. वैयक्तिक लाभाच्या योजना घराघरात पोहचवून लाभार्थींना लाभ मिळवून दिला आहे. या कार्यक्रमाला  विधानसभा निवडणूक प्रमुख विकास कापसे जिल्हा उपाध्यक्ष  प्रकाश वाकळे, जिल्हा सरचिटणीस एल जी गायकवाड ,तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे , शहराध्यक्ष परसराम बारगळ तालुका सरचिटणीस दांडेकर शिवाजी गायकवाड प्रशांत गदानकर, राहुल निकुंभ माजी उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ, सुरेश मरकड, माजी सभापती अर्चनाताई अंभोरे, माजी उपसभापती दिनेश अंभोरे युवराज ठेंगडे प्रभाकर शिंदे प्रकाश चव्हाण, माजी नगरसेवक योगेश बारगळ, मच्छिंद्र लिंगायत, अविनाश कुलकर्णी, आशिष कुलकर्णी, लीलाबाई बारगळ युवा मोर्चा तालुका अध्यक्ष सतीश खंडागळे कामगार आघाडीचे अध्यक्ष अविनाश वेताळ अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष मुख्तार पठाण, बाबासाहेब नागे, गोविंद काळे, अमोल गवळी, कृष्णा चव्हाण, नंदू चव्हाण, बाबासाहेब औटे, भागचंद जोनवाल, प्रेम सिंग जोनवाल, राहुल चव्हाण, योगेश काळे, अरुण चव्हाण, अंकुश काळे, रावसाहेब देशमुख, बाळू नलावडे, गणेश झुरावत, विजय चांदवडे, सुखदेव ठेंगडे, गणेश हजारी, रावसाहेब तांदळे सतीश आहेवाड, संतोष गायकवाड, निलेश गायकवाड, अंकुश गायकवाड, सुभाष ठोंबरे, सौरव खंडेलवाल, बबन वर्दे, श्रीकांत जाधव, अरुण पाटे, राजेंद्र बडे, अनिल करपे, राहुल हजारे, शेख अझरुद्दीन, गणेश बारगळ, प्रवीण बारगळ, राजू बारगळ, ज्ञानेश्वर बारगळ, संजय बारगळ आदी उपस्थित होते.

# समाजाच्या हितासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू

## सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**



**जिंतूर :** धार्मिकता, सात्वी कता आणि प्रामाणिकपणाने वागणारा समाज म्हणून आर्य वैश्य समाजाची ओळख राहिलेली आहे. याच समाजात आपला जन्म झाला असल्याने आपण धन्य झालो आहोत असे सांगून आर्य वैश्य समाजाच्या हितासाठी आपला सदैव प्रयत्न राहणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री नामदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी पंढरपूर येथे केले. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने पंढरपूर येथे दिनांक 3 व 4 फेब्रुवारी रोजी जिल्हा कार्यकारी मंडळाचे तिसरे अधिवेशन भरविण्यात आले. त्या अधिवेशनात नामदार सुधीरभाऊ मुनगंटीवार बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून निजामाबादचे आमदार धनपाल सूर्यनारायण, काशी अन्नसत्रमचे विलास बच्चू, चैतन्योदय गुरुकुल आश्रम जिंतूर येथील आचार्य महेश महाराज जिंतूरकर, तिरुमल्ला तिरुपती देवस्थानच्या माजी विश्वस्त सपनाताई मुनगंटीवार, महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या महिला प्रभारी अध्यक्षा माधुरीताई कोले, महासभेच्या महिला कार्याध्यक्षा सुलभाताई वट्टमवार,महाराष्ट्र राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार, अमरावती महानगरपालिकेचे माजी आयुक्त प्रवीण आष्टीकर, महासचिव गोविंदराव बिडवई ,कोषाध्यक्ष सुभाष कन्नावार, महासभेचे माजी अध्यक्ष एकनाथ मामडे, नगरेश्वर वैश्य मंदिराचे माजी अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, बांधकाम समितीचे अध्यक्ष भानुदास वट्टमवार, कोषाध्यक्ष अनिल मनाठकर, महिला महासचिव शिल्पाताई पारसवार, कोषाध्यक्षा राजश्रीताई पारसवार, सोलापूर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कौलवार, सचिव डॉ. सचिन लादे, कोषाध्यक्ष अविनाश नलबिलवार, संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार, राज्य प्रसिद्धी प्रमुख नरेंद्र येरावार, उपाध्यक्ष सूर्यकांत शिरपेवार, नंदकुमार मडगुलवार, सुधीर पाटील, जयंत बोंगिरवार, राजू मुक्कावार, विजय निलावार, विजय बंडेवार आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. नामदार सुधीर मुनगंटीवार यांचे पंढरपूर नगरीत भव्य दिव्य प्रमाणात समाज बांधवांच्या वतीने स्वागत करण्यात आले. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी नामदार सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा ही आता संपूर्ण राज्यात पोहोचली आहे. समाज हिताच्या दृष्टिकोनातून महासभा कार्य करीत असून महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. समाजातील प्रत्येक समाज बांधवांनी स्वतःची तर प्रगती करावी, मात्र समाजाच्या प्रगतीला सर्वांनी हातभार लावावा. समाज आपल्याला काय देत आहे. हे न पाहता आपण समाजाला काय देतो हे पाहणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. नामदार मुनगंटीवार आणि महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांच्या वाढदिवसानिमित्त महासभेच्या वतीने वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराचा उपक्रम राबविला. या उपक्रमात सहभागी झालेल्या जिल्हा, तालुका व गाव पातळीवर पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.

राज्य प्रसिद्धीप्रमुख नरेंद्र येरावार यांनी प्रसिद्ध केलेल्या विविध वृत्तपत्रातील बातमी संग्रह पुस्तकाचे प्रकाशन नामदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात येऊन पत्रकार नरेंद्र येरावार यांचा सन्मान करण्यात आला आहे. याप्रसंगी सुमित रुद्रवार बीड, सुरेश पेन्शलवार लातूर, सुरेश रुद्रवार संभाजीनगर, रत्नाकर काप्रतवार जालना, बालाजी डुबेवार परभणी, सचिन गुंडेवार हिंगोली, तुकाराम माणिकवार धाराशिव, विजयकुमार कुंचनवार नांदेड ग्रामीण, लक्ष्मीकांत मुक्कावार नांदेड शहर, अनंता भोगावार वर्धा, सुनील पडगिलवार नाशिक, ज्ञानेश्वर काप्रतवार पुणे, प्रशांत तम्मेवार गडचिरोली, अनिल माडुरवार चंद्रपूर, संजय पालतेवार यवतमाळ, दीपक निलावार नागपूर, चंद्रकांत प्रतापवार अमरावती, प्राजक्ता गुंडेवार, अंजली कोटलवार, स्मिता झरकर, सुषमा कोटगिरी, जयश्री कलकोटे, रूपाली दलाल, उज्वला माणिकवार, सुषमा शक्करवार, सपना नलवलवार, समृद्धी कोकडवार, सोनाली विरमलवार, आरती भिमनवार, आदिती तातावार, श्वेता पदमवार, मनाली कलूरवार, जया चिंतावार यांच्यासह युवा महासभेचे राजू कौलवार, अभिषेक सातारकर, विठ्ठल डमडरे, राजेंद्र वट्टमवार, प्रितेश देवशेटवार, प्रवीण पेन्शनवार, माधव निलावार यांच्यासह महासभेचे जिल्हा कार्यकारी मंडळाचे सर्व पदाधिकारी, महिला आणि युवा ग्रुप राजू कौलवार व विठ्ठल कटकमवार आणि सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोलापूर जिल्ह्याचे सचिव सचीन लादे,अनिल मुगटकर यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्रसिद्धीप्रमुख नरेंद्र येरावार यांनी केले आहे. पंढरपूर येथील समाजातील बांधवांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला उपस्थितांनी दाद दिली.



# माता रमाई व बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श आजच्या तरुणांनी घ्यावे

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** माता रमाई यांनी हाल अपेष्ठा सहन करुन बाबासाहेबाना शिक्षण शिकवल आणि कष्टाने संसार त्याकाळी आपला चालवले, बाबासाहेब आंबेडकराना साथ दिले. समाज पुढे गेला पाहिजे यांचे धोरण होते. यांचे आर्दश घेऊन तरुण पिढीने शिक्षण घेतले पाहिजे. त्याग केले म्हणून देश स्वतंत्र झाला त्याच पध्दतीने रमाई ने त्याग केले म्हणून बाबासाहेब जगात प्रसिद्ध झाले.असे गौरवदगार मारोतराव कवळे गुरुजीने प्रतिपादन केले. मौजे शिंधी येथे माता रमाई यांच्या जन्मोत्सव निमित्त प्रतिमेचे पूजन शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरूजी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शोभाबाई वाघमारे, माजी सरपंच प्रभाकरराव पा. पुयेड,लिंगराम पाटील कवळे, सरपंच विलास पाटील नरवाडे,नारायणराव पाटील कवळे, साईनाथ परमेश्वर पाटील कवळे, दिलीप पाटील पुयेड, ग्रामविकास आधिकारी जय वनंसागरे, बळीराम गायकवाड, गंगाधर गायकवाड,चंपती गायकवाड, संदेश गायकवाड, विकास वाघमारे,सुरेश शेळके, विकास वाघमारे, नरसिंग वाघमारे,सजन वाघमारे,पो. पा.प्रशांत पिन्नलवार, गुलाब गायकवाड उपस्थित होते.

# गावठी कट्टा, जिवंत काडतुसासह एक तरुण जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** लगत असलेल्या निमगाव कोराळे शिवारात नगर मनमाड रोड लगत एका हॉटेलच्या समोर एका तरुणाकडे गावठी कट्टा असल्याची गुप्त माहिती शिर्डी पोलीसांना मिळताच शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी पाटील व पोलीस पथकाने तात्काळ त्या ठिकाणी भेट देऊन सापाळा लावून त्या ठिकाणी उभे असलेल्या एका संशयित तरुणाला शिताफिने ताब्यात घेतले असता त्याच्याकडे गावठी कट्टा किंमत २५ हजार रुपये व दोन जिवंत काढतुस त्याच्याकडे अंगझडती घेतली असता मिळून आले पोलीसांनी त्याचे नाव गाव विचारले असता त्यांने त्याचे नाव साईनाथ भाऊसाहेब जाधव उर्फ डोळा वय २२राहणार निमगाव कोराळे असे सांगितले त्याला ताब्यात घेऊन त्याच्याविरोधात गुन्हा रजिस्टर नंबर ७५/ २०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम, ३७(१) सह१३५प्रमाणे पोलीस कर्मचारी बाबासाहेब जराड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे शिर्डी हे धार्मिक क्षेत्र असताना या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून काही दिवसापूर्वीच शिर्डीत आलेल्या साईभक्त भाविकांवर याच परिसरात गोळीबार करून लूटमार करण्यात आली होती तसा गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता या परिसरात नेहमीच गुन्हेगारांचा वावर असून अधून मधून या परिसरात खून खुनाचा प्रयत्न हाणामाऱ्या लुटमार असे प्रकार घडलेले आहे संदरची कारवाई जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला उपविभागीय अधिकारी शिरीष वमणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे या कारवाईत बाबा खेडकर गजानन गायकवाड बाबासाहेब जराड यांनी भाग घेतला आधिक तपास सपोनि संभाजी पाटील हे करीत आहे.

# अय्युब पठाण यांच्या 'दान दे !' कवितेची निवड



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेच्यावतीने महाराष्ट्रातील पहीले ऐतिहासिक शिक्षक साहित्य संमेलन १० फेब्रुवारी २०२४ ला कांचनवाडी येथील अग्रसेन विद्या मंदिरात होणार आहे. या संमलेनात पैठण तालुक्याचे प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक तथा बालभारतीच्या पाठय पुस्तकातील कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांना शिक्षक साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून सन्मानाने बोलविले आहे.कवी अय्युब पठाण हे निसर्गावर आधारीत " दान दे " ही नऊ अक्षरी कविता सादर करणार आहे.या कवि संमेलनात एकूण ५४ निमंत्रित कवी/ कवयित्रिची निवड झालेली असून त्यात त्यांचाही सहभाग राहणार आहे.

# विश्वाला मानवतेची शिकवण देणारा वारकरी संप्रदाय : ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** येथे चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यामध्ये प्रथम दिवसाचे कीर्तन रुपी सेवा हभप जगन्नाथ महाराज पाटील महाराज यांची झाली एकादशीच्या पर्वकाळावरती निवृत्तीनाथाचे महत्त्व सांगताना धन्य धन्य निवृत्ती राया |काय महिमा वर्णना|| या अभंगावरती महाराजांनी वेगवेगळे प्रमाणे देऊन भगवंतांची थोरवी वर्णिली.पुढे उपदेश करतांना पाटील महाराज म्हणाले की गोड असं संत चरित्र जीवनामध्ये नेहमीच गायन करावं संतांच्या चरित्राने भगवंताला आनंद वाटतो म्हणून आज गणेशाची चैतन्य मूर्ती या ठिकाणी गणरायाचं वेगवेगळ्या अंगाने वर्णन करून गणराया सर्वांना बुद्धी देणार आहे आणि त्या बुद्धीच्या जोरावरती फार मोठा उच्चांक गाठता येतो जीवनामध्ये सत् सत् विवेक बुद्धीने परमार्थ करावा आणि निश्चितच वारकरी संप्रदाय एवढा महान आहे की याचा संदेश यांचा अंगीकार यांचा आचरण पाश्चिमात्य देशातील लोकांनी करावं असा मोलाचा संदेश महाराजांनी दिला तरूणानी पर्माथ करावा , उद्योग करावा असे प्रतिपादन पाटील महाराजांनी केले उपस्थित सुदाम महाराज निर्मळ गोरक्षनाथ महाराज सोनवणे गायनाचार्य भगवान महाराज गाडेकर तुळशीराम महाराज दाभाडे दादा महाराज पाटील काका महाराज खैरे प्रदीप महाराज बनकर मृदंगाचार्य उमेश मराठा ठोंबरे मयूर महाराज मोहिते शिवाजी महाराज शेवाळे गणेश महाराज देठे कदम महाराज शेजुळ महाराज सोमनाथ आबा हिवाळे संयोजक विष्णू महाराज सास्ते गावकरी मंडळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात स्नेहसंमेलन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** CSMSS क्रिकेट स्पर्धेचे क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, अभीयांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास, शिंदे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, मानव संसाधन अधिकारी अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील, उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार आणि विभागप्रमुख, विद्यार्थी, स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस कर्मचारी उसनवारीवर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महिन्यांचा पहिला आठवडा उलटल्यानंतरही नागपूर शहर पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पगार झाले नाहीत. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे उसनवारीवर काम आले असून स्वयंपाकघरातील 'बजेट' बिघडल्याने गृहिणी नाराज आहेत. पगार रखडल्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. उपराजधानीत जवळपास ८ हजार १०० पोलीस अधिकारी आणि कर्मचारी नियुक्तीला आहेत. पूर्वी पोलीस विभागाचा पगार अगदी एक तारखेला होत होता. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून पगार महिन्याच्या एक ते दोन आठवडे होत नाहीत. वेळेवर पगार होत नसल्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांची अनेक कामे खोळंबतात. एकीकडे किराणा, मुलांचे शिक्षण, आजारपण उधार उसनवारीवर भागविल्या जात आहेत. बँकेकडून घेतलेल्या जीवनविमा, गृहकर्ज, खासगी कर्जासह वेगवेगळ्या कर्जांचे हप्ते पगारातून वजा होत असतात. मात्र, पगारच वेळेवर होत नाही म्हणून प्रत्येक महिन्यात हजार ते अठराशे रुपयांचा बँकेचा दंड, 'चेक बाऊन्स'चे शुल्क असा भुर्दंड कर्मचाऱ्यांना सहन करावा लागत आहे.



# भाजप सरकार विद्यार्थी विरोधी : प्रदेशाध्यक्ष गव्हाणे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील शरद पवार गट लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर जोरदारपणे कामाला लागल्याचे दिसत आहे. एका बाजूला शहरातील नेत्यांच्या मुंबईला बैठका वाढल्या आहेत तर दुसऱ्या बाजूला प्रदेश पदाधिकारी शहराला भेटी देत आहेत. याच पार्श्वूमीवर काल राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात तरुण पदाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी धुळे शहराध्यक्ष रणजीत राजे भोसले, शकीला बक्ष, उषा पाटील, वाल्मीक मराठे, राजू चौधरी, दीपक देवरे, भोला सैंदने, विश्वजीत देसले, रामेश्वर साबरे, युसूफ शेख, समद शेख, प्रशांत बोरसे, अभिजित देवरे, निखिल मोमया, निखिल पाटील, आविष्कार मोर, गौरव भैरव आणि इतर तरुण पदाधिकारी उपस्थित होते.
यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांनी सांगितले की, आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर आम्ही जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणार आहोत. नवीन मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी विद्यार्थी संघटना प्रयत्नशील राहणार आहे. यासाठी आमचे पदाधिकारी संघटन, उपक्रम, आंदोलन या त्रिसूत्रीवर काम करत पक्षाचा विस्तार करणार आहेत. विद्यमान सरकार हे विद्यार्थी विरोधी सरकार आहे. एका बाजूला उत्तर भारतातील परीक्षा घोटाळ्यांचा पॅटर्न आता महाराष्ट्रात राबवला जात आहे, तर दुसऱ्या बाजूला पाठीमागच्या दारातून कंत्राटी भरती प्रत्येक विभागात सुरू आहे असा आरोप ह्या ठिकाणी करण्यात आला. त्यातून भाजप आपल्या हिताच्या लोकांना शासकीय व्यवस्थेत सहभागी करुन घेत आहे आणि त्या माध्यमातून शासकीय यंत्रणांचा ताबा घेत आहे. राज्यातील कंपन्या गुजरातला पळवल्या जात आहेत. संशोधक विद्यार्थ्यांना त्यांची हक्काची आधीछात्रवृत्ती नाकारली जात आहे. शिक्षण हक्क कायदा (आरटीई) नुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शासनाकडून गेले तीन वर्ष झाले करण्यात आलेली नाही, त्यामुळे खाजगी शाळा विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारत आहेत. दुसरीकडे मात्र सांस्कृतीक अस्मितेच्या इव्हेंटच्या आड विद्यार्थ्यांच्या मूळ प्रश्नांना बगल दिली जात आहे. अशी टिका प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांनी केली.
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धुळे शहराध्यक्ष रणजित राजे भोसले यांनी यावेळी नवीन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. नवीन तरुणांनी शरद पवारांनी केलेले काम समजून घेतले पाहिजे व ते नव्या पिढीला समजावून सांगायला हवे. आगामी लोकसभा निवडणुकीत युवा पिढीवर महत्त्वाची जबाबदारी असून प्रचाराची जबाबदारी त्यांनी आपल्या खांद्यावर घ्यायला हवी. जिल्हाध्यक्ष म्हणून नवीन पिढीला संधी देण्याची भूमिका पुढील निवडणुकांत घेतली जाईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. आगामी काळात धुळे लोकसभा कार्यक्षेत्रात येणाऱ्या विविध भागात मोठ्या प्रमाणावर संघटन उभे करून पक्षाची ताकद वाढवत लोकसभेची जागा खेचून आणण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

# जिल्हा परिषद शाळांचा तालुकास्तरीय सांस्कृतिक महोत्सव उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर द्वारा आयोजित "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा " या अभियान अंतर्गत सहशालेय उपक्रमामध्ये महत्त्वपूर्ण असलेल्या तालुकास्तरीय सांस्कृतिक महोत्सव तथा बाल आनंद महोत्सव अतिशय भव्य दिव्य स्वरूपात श्री राधाकृष्ण मंगल कार्यालय जिंतूर येथे दि.06 फेब्रुवारी 2024 रोजी संपन्न झाला.
या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी तहसीलदार राजेश सरवदे, गटविकास अधिकारी शिवराज केंद्रे, गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानोबा साबळे, मंगेश नरवाडे, श्री राधाकृष्ण मंगल कार्यालयाचे सर्वेसर्वा कैलास आदमाने, केंद्रप्रमुख शंकर भारशंकर, मारोती घुगे, पांडुरंग भांबळे, दिनकर घुगे, गणहिरे, शंकर चव्हाण, परीक्षक शंकर दांडगे, सुनिता मगर, विनोदकुमार वाव्हळ, प्रकाश डुबे, शंकर माने, विष्णु शिंदे, मुख्याध्यापक केशव घुगे, तुकाराम चव्हाण विचारमंचावर उपस्थित होते.
मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान अंतर्गत या सहशालेय उपक्रमांना महत्त्व आहे. या अनुषंगाने अतिशय भव्य दिव्य आणि आगळ्यावेगळ्या स्वरूपात संपन्न होत असलेल्या तालुकास्तरीय सांस्कृतिक महोत्सवासाठी सहभागी विद्यार्थी व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांना तहसीलदार राजेश सरवदे आणि गटविकास अधिकारी शिवराज केंद्रे यांनी आपल्या मनोगतातून शुभेच्छा दिल्या.
अध्यक्षीय समारोपामध्ये गटशिक्षणाधिकारी त्रंबक पोले यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी. बौद्धिक, शारीरिक, भावनिक, मानसिक या सर्व अंगाने विचार करणे आवश्यक असते. या चारही अंगाने विद्यार्थ्यांचा विकास करता आला तर विद्यार्थी चतुरंग आणि चतुरस्त व्यक्तिमत्व म्हणून भविष्यात उदयाला येतो. सन्माननीय मुख्यमंत्री महोदय यांचे महत्वकांक्षी अभियान म्हणजे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान आहे. या दृष्टीने ही सांस्कृतिक महोत्सवाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे प्रयत्नपूर्वक या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन माझ्या संपूर्ण टीमकडून करण्यात आले आहे.
या सांस्कृतिक महोत्सवात विविध शाळांचे एकूण 77 सादरीकरण झाले. उत्स्फूर्त आणि उदंड सहभाग या कार्यक्रमाला लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले.
सांस्कृतिक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी योगिता संगवई, राहुल उबाळे, सचिन चव्हाण, नितीन पेठे, भास्कर मुंडे, माऊली वटाणे यांनी मेहनत घेतली.



# दोन कोटींच्या गांजासह तस्कराला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) पथकाने गांजाची तस्करी करणाऱ्यास ट्रकसह पकडले. ही कारवाई बोरखेडी टोलनाक्यावर मंगळवारी पहाटेच्या सुमारास करण्यात आली. झडतीत ट्रकमधून एक कोटी ९५ लाख १० हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला. शंकर (४५) रा. विशाखापट्टनम असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. आरोपीला न्यायालयात हजर करून त्याची मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. विशेष म्हणजे डीआरआयच्या पथकाने २०१९ मध्ये गांजाची सर्वात मोठी कारवाई केली होती. दिवाळी दरम्यान बोरखेडी परिसरात सापळा रचून २ हजार ८० किलो गांजा जप्त केला होता.
ओडिशा आणि आंध्र प्रदेशात गांजाची मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते. याच राज्यांतून देशभरात गांजाचा पुरवठा केला जातो. रेल्वे आणि रस्ते मार्गाने गांजाची वाहतूक केली जाते. गांजा पोहोचविणाऱ्याला एका खेपेची मोठी रक्कम मिळते. महिला, विद्यार्थी आणि अल्पवयीन मुलांचा यासाठी वापर केला जातो. एका शहरातून दुसऱ्या शहरात गांजा पोहोचविने एवढेच त्यांचे काम असते. त्यामुळे म्होरक्या पोलिसांच्या जाळ्यात अडकत नाही आणि गांजाची तस्करी अशीच सुरू असते. तस्करी करणाऱ्या शंकरने आंध्र प्रदेशातून एका ट्रकमध्ये गांजा भरला. पॉलिथिनच्या पॅकेटमध्ये गांजा ठेवला, टेपपट्टीने चिटकवून पॅकेट बंद केले. असे अनेक पॅकेट ट्रकमध्ये भरले. संशय येऊ नये म्हणून त्यावर शेणखताचे पोते ठेवले आणि उत्तरप्रदेशात माल पोहचविण्यासाठी निघाला. तस्करांना जाण्यासाठी बोरखेडी हा एकमेव मार्ग आहे. मोठ्या प्रमाणावर गांजाची तस्करी होणार असल्याची गुप्त माहिती डीआरआयच्या पथकाला मिळाली. पथकातील सहा सदस्य पहाटेपासून बोरखेडी परिसरात सापळा रचून होते. पथकाने ट्रकची झडती घेतली असता त्यात शेणखताचे पोते दिसले. पोते उचलून पाहिले असता गांजाचे पॅकेट मिळून आले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# सुदर्शन समाज बांधवांसह प्रभू रामचंद्रांचे पूजन

## प्रसाद वितरण व महाप्रसादाचा अभिनव कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अयोध्येत प्रभु श्रीरामललांचे दर्शन घेतल्यानंतर या पुण्य, पवित्र नगरीतून आणलेल्या प्रसादाचे व प्रभु रामजींच्या मुर्तीचे धार्मिक मंत्रोच्चारात पूजन करून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी रामललांच्या चरणी श्रध्दासुमने अर्पित केली.

स्थानिक दादमहल वार्डातील महर्षी सुदर्शन महाराज व वाल्मिकी ऋर्षीच्या मंदीरात दि. 05 फेब्रुवारी 2024 रोजी सुदर्शन समाज बांधव व भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतीने पवित्र प्रसाद व रामललांच्या मुर्तीचे पुजन आयोजित करण्यात आले होते. या धार्मिक उत्सवास सर्वस्वी विजय राऊत, खुशाल बोंडे, अनिल फुलझेले, राजेश मुन, अंजलीताई घोटेकर, सुदर्शन समाज अध्यक्ष दिलीप हजारे, रमेश भूते, रवी गुरुनुले, ॲड. आषिश मुंधडा, राजु अडपेवार, विनोद शेरकी, राजू घरोटे, दिनकर सोमलकर, मनिषा महातव, वंदना संतोषवार, पं. मयूराप्रसाद पांडे, बळीराम महातव, चंद्रशेखर मलीक, आनंद मलीक आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी सुदर्शन समाजातील ज्येष्ठ महिला व पुरुषांचा हंसराज अहीर यांनी शाल व श्रीफळ देवून सन्मान केला. या प्रसादपुजन कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास राजू राठोड, मुन्ना मलिक, देवीदास हजारे, संजय निरके, गणेश मारवे, सुनिल महातव, राज बिरीया, अरविंद बकसरीया, मोनो मलिक, प्रल्हाद हजारे, बादल मलिक, करण मलिक, अमित राठोड, राकेश हजारे, तिलक सिकलवार, श्याम व्यास, ब्रिजेश हजारे, राजेश हजारे, मुकेश हजारे, सचिन हजारे, राज हजारे, रामू मतेलकर, शांताबाई मलिक, कमलाबाई मलिक, रजनी हजारे, गंगाबाई हजारे, बबली मतेल, अनिता शिरके, शैलेष इंगोले, रवी चहारे, प्रदिप किरमे, गणेश गेडाम, प्रमोद शास्त्रकार, राजेंद्र खांडेकर, चंद्रकला सोयाम, वंदना जांभूळकर, शितल आत्राम, ॲड. सुरेश तालेवार, विठ्ठल डुकरे, बाळू कोतपल्लीवार, ॲड. हरीष मंचलवार, रेणुकाताई घोडेस्वार, शालू कन्नोजवार, मुग्धा खांडे, नकुल आचार्य, श्याम बोबडे, मधुकर राऊत, सुभाष आदमने, प्रसाद काटपाताल, शेंद्रे सर, सुरज खोटे, राहूल मारवे, भिम मलिक, अमित राठोड, विजेश हजारे, राकेश हजारे, यांचेसह सुदर्शन समाज बांधव व भाजप पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मोनीषा महातव यांनी केले.

# दिल्लीच्या महिला संघाने पटकावला कबड्डी स्पर्धेचा आमदार चषक

## पुरुष गटात विठ्ठल क्रीडा मंडळ विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पेनतून आयोजित श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. या महोत्सवा निमित्त जय श्रिराम क्रिडा मंडळ, चंद्रपूर च्या वतीने आयोजित कबड्डी स्पर्धेचा बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाने समारोप करण्यात आला आहे. यात दिल्लीच्या महिला संघाने आमदार चषक पटकाविला आहे तर पूरुष गटात विठ्ठल क्रिडा मंळड, चंद्रपूरचा संघ विजयी झाला आहे. विजयी संघाना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरित करण्यात आले.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार, यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, मधूरकर बनकर, भास्कर कावळे, शरद बनकर, अमीत लडके, ताहिर हुसेन, राम जंगम, अतुल बनकर, पिंटु गावतूरे, राजेश गुटके, किशोर रायपूरकर, मंगला आखरे, नकुल वासमवार, राशेद हुसेन, कार्तिक बोरेवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती. चंद्रपूरचे आ. जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. बिनबा वार्ड येथे आयोजित क्रिकेट स्पर्धेने या महोत्सवाला सुरवात करण्यात आली होती. तर २ फेब्रुवारी पासून भिवापूर येथील माता नगर येथे कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यात परभणी, वासीम, लातूर यासह राज्याबाहेरील दिल्लीच्या दोन महिला संघाने सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेत ४० संघ सहभागी झाले होते. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेचा बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाने समारोप करण्यात आला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांची प्रामूख्याने उपस्थिती होती. यावेळी झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात दिल्लीच्या संघाने बाजी मारली तर पुरुष खुल्या गटात विठ्ठल मंदिर क्रिडा मंडळ, चंद्रपूरचा संघ विजयी झाला. यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले कि, एक उत्तम आयोजन येथे करण्यात आले. यात दिल्लीच्या संघाने सहभाग घेतला हेच श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाचे यश आहे. या महोत्सवाला आपण चंद्रपूरची अराध्य दैवत माता महाकालीचे नाव दिले आहे. त्यामुळे आता या महोत्सवाच्या माध्यमातून मातेचा नावाचा जयघोष दिल्लीत पोहचला आहे. या भागाच्या विकासासाठी आपण कटिबध्द आहोत. येथील मंडळाने कबड्डी मॅटची मागणी केली आहे. ती मान्य आहे. क्रिडा क्षेत्रासाठी शक्य ते सर्व सहकार्य करण्याचा आमचा मानस असल्याचे ते यावेळी म्हणाले.



**नागरिकांच्या वतीने जेसीबीने फुलांचा वर्षाव करत आ . जोरगेवार यांचे स्वागत :** मागील चार वर्षात आमदार किशोर जोरगेवार यांनी भिवापूर प्रभागाच्या विकासासाठी जवळपास सात कोटी रुपयांना निधी दिला आहे . या निधीतून येथे मुलभुत सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहे . त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या सुटल्या आहे . या निमित्त आमदार किशोर जोरगेवार यांचे क्रिडा महोत्सवात आगमन होताच जय श्रीराम क्रिडा मंडळ व स्थानिक नागरिकांच्या वतीने चक्क पाच जेसिबी मशीन ने आमदार किशोर जोरगेवार यांच्यावर फुलांचा वर्षाव करत त्यांचे भव्य स्वागत केले . यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी ही आभार व्यक्त करत येथे आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देणार असल्याचे म्हटले आहे .



# शासकीय ग्रेड परीक्षेत विद्यालयाचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**अजय नजन**

**भातकुडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव ने संचालित भातकुडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयचा एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ग्रेड परिक्षेचा शंभर टक्के निकाल लागला असून यामध्ये एलिमेंटरी परिक्षेत कु.स्नेहल बाळासाहेब आहेर हिला तर इंटरमिजिएट परिक्षेत श्रावणी बाबासाहेब फटांगरे या विद्यार्थीनींना ए ग्रेड मिळाला आहे. तसेच एलिमेंटरी परिक्षेत बी ग्रेड प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे कोमल दत्तात्रय नजन अक्षदा चंद्रभान फटांगरे गौरी एकनाथ भालेराव त्याचप्रमाणे इंटरमिजिएट परिक्षेत बी ग्रेड प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे ओम रविंद्र काळे भाग्यश्री काकासाहेब आहेर आयेशा मुबारक सय्यद इलिमेंटरी परिक्षेत एकुण ०८ परीक्षार्थीने सी श्रेणी मिळवली तर इंटरमिजिएट परिक्षेत एकुण ११ विद्यार्थ्यांनी सी श्रेणी मिळवली सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार डॉ नरेंद्रजी घुले माजी आमदार चंद्रशेखर घुले जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्रीताई घुले माजी सभापती डॉ क्षितिज घुले प्रशासकीय अधिकारी के.वाय नजन प्राचार्य शाहूराव घुटे कला विषय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# मनाने श्रीमंत असणारी माणसेच समाज घडवू शकतात : ननावरे

## स्व. समिता भोसले स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'शिवाजीनगररत्न पुरस्कार 'समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** अलिकडच्या काळात माणसाच्या मनातील कृतज्ञता व संवेदनशीलता हरवली जात आहे. माणसाने माणसाचा आधार बनण्याची भावना संपुष्टात येवू लागली आहे. त्यासाठी मुलांवर योग्य संस्कार होणे गरजेचे आहे. केवळ संपत्तीचा मोह धरून जीवन जगणे योग्य नाही तर समाजाप्रती दातृत्वाची भावना जोपासणे गरजेचे आहे. मनानं श्रीमंत असणारी माणसचं समाज घडवू शकतात असा विश्वास इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांनी व्यक्त केला.

शिवाजीनगर ता. खंडाळा येथील स्व. समिता भोसले स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित ' शिवाजीनगर रत्न पुरस्कार 'समारंभानिमित्त ' इतिहास व समाजजीवन ' या विषयावर ते बोलत होते. यावेळी पोलीस उपायुक्त पौर्णिमा बांदल, वसंतराव बांदल, उद्योजक धनाजी भोसले, सरपंच हर्षवर्धन भोसले , उपसरपंच राधिका सपकाळ, औद्योगिक सेल अध्यक्ष राजेंद्र भोसले, ग्रा.पं. सदस्य सुजीत डेरे, सोसायटीच्या चेअरमन कोमल डेरे, नानासाहेब हाके यांसह प्रमुख उपस्थित होते.

याप्रसंगी राज्य कर निरिक्षक काजल सपकाळ यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.मुलांना घडविणे ही आई वडिलांची मोठी जबाबदारी आहे.माता प्रेम देते माया देते संस्कार देते आणि पित्याच्या धाकामुळे शिस्त लागते त्यामुळेच मुलांच्या आयुष्याला आकार मिळतो. मात्र मुलांनीही वृद्धापकाळात आईवडिलांची सेवा करणे गरजेचे आहे.

मातापित्यांची सेवा हाच खरा मानवता धर्म आहे. ज्या घरात वृद्ध आहेत तिथे संस्कार प्रवाहित होतात, त्यामुळे त्या घराचा कोणीही कधीही पराभव करू शकत नाही. ज्या घरात आईवडील नाहीत त्यांना त्यांची खरी किंमत कळते. जीवनात अनेक संकट येतात मात्र त्यांना न घाबरता त्याचा सामना केला पाहिजे कारण संकटं आपणाला अडवायला येत नाहीत तर ती घडवायला येतात. संकटातून मार्ग काढला की यशाची दारे खुली होतात. जीवनाच्या प्रवासात चांगल्या विचारांची कास धरा. त्याच उदात्त हेतूने मार्गक्रमण करा. शेवटी पेरलं तेच उगवलं जातं हा सृष्टीचा नियम आहे. त्यामुळे विधायक विचारातून सामाजिक विकासासाठी योगदान द्यावे असे आवाहनही त्यांनी केले. स्वागत राजेंद्र भोसले यांनी केले तर हर्षवर्धन भोसले यांनी आभार मानले.




# मेजर दिनुभाऊ कुलकर्णी क्रीडा मंडळाच्या वतीने सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** क्रीडा महर्षी मेजर दिनुभाऊ कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ अहमदनगर येथील मेजर दिनुभाऊ कुलकर्णी क्रीडा मंडळ व योग विद्याधाम अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी बंधन लॉन्स सावेडी अहमदनगर येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी या सूर्यनमस्कार स्पर्धेसाठी १२०० हून अधिक शालेय विद्यार्थी सहभागी होत असतात.स्पर्धेचे हे ९ वे वर्ष आहे.या स्पर्धेमध्ये इयत्ता दुसरी ते पाचवी मुले पहिला गट,दुसरी ते पाचवी मुली दुसरा गट, इयत्ता सहावी ते आठवी मुले तिसरा गट, इयत्ता सहावी ते आठवी मुली चौथा गट असणार आहे.चारही गटातील प्रथम क्रमांकाच्या संघाला रोख १००० रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकाच्या संघाला ७०० रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकाच्या संघाला ५०० रुपये व सन्मानचिन्ह,चतुर्थ क्रमांकाच्या संघाला २५० रुपये व सन्मानचिन्ह दिले जाणार आहे.तसेच चारही गटातून प्रत्येकी तीन संघांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.त्याचप्रमाणे सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. तसेच सूर्यनमस्कार स्पर्धेदरम्यान विविध मर्दानी खेळ प्रकारांची प्रात्यक्षिके उपस्थितांना दाखवली जाणार आहेत. तरी अहमदनगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांनी या सूर्यनमस्कार स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन मेजर दिनुभाऊ कुलकर्णी क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर खेडकर, सचिव नंदेश शिंदे, सदस्य खासेराव शितोळे, मार्गदर्शक डॉ.गिरीश कुलकर्णी यांनी केले आहे.तसेच विविध क्रीडा प्रेमींनी या स्पर्धेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# विविध मागण्यांसाठी डोणगावच्या युवकांचे बेमुदत उपोषण

## गावाच्या हिताच्या मागण्यांसाठी गावकऱ्यांचा उपोषणास पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज




**शंकर सदार**

**डोणगाव :** डोणगाव येथील युवकांनी गावातील ज्वलंत समस्या साठी ग्रामपंचायत डोणगाव, मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा, गट विकास अधिकारी मेहकर यांना निवेदन देवून डोणगाव येथील समस्यांचे निराकरण करण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. युवकांनी आमरण उपोषणास 5 फेब्रुवारी पासून सुरवात केली ज्याला गावातील सर्व स्थरातून उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. डोणगाव येथील युवकांनी दिलेल्या निवेदनात नमूद होते की, डोणगाव सर्वे नंबर 123 मधील पडीक ढोर दवाखान्याच्या जवळील कचरा व काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. येथील सर्व अतिक्रमण काढण्यात यावे व बाजूचा रस्ता मोकळा करण्यात यावा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह ते सोसायटी कॉम्प्लेक्स डोनगाव पर्यंतच्या जागेत वॉल कंपाऊंड करण्यात यावे. डोणगाव बस स्थानकावरील मोडकळीस आलेल्या स्वच्छतागृहा जागी नवीन स्वच्छतागृह बांधण्यात यावे. जुन्या बैल बाजार परिसरात असलेल्या मटन मार्केटला संरक्षण भिंत उभारण्यात यावी व तेथील स्वच्छता करण्यात यावी, जेणेकरून पसरत असलेली दुर्गंधी टळेल. ग्रामपंचायत कार्यालय डोणगावणे अर्धवटपणे बांधलेल्या ग्रामपंचायत कॉम्प्लेक्स मधील राहिलेली कामे पूर्ण करण्यात यावी व तेथील काम पूर्णत्वास नेऊन कॉम्प्लेक्स धारकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात, याव्यात आठवडी बाजारातील भाजीपाला विक्रेत्यांना टिन शेड करून देण्यात यावे.सर्वे नंबर 123 मध्ये झालेले अतिक्रमण पूर्णपणे हटविण्यात यावे. इत्यादी विषयांना अनुसरून जिल्हाधिकारी बुलडाणा व जि. प.बुलडाणा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना डोणगांव येथील युवकांच्या वतीने आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र प्रशासनाने कोणतीही दखल घेतलेली नाही तेव्हा 5 फेब्रुवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालय समोर उपोषण करते सागर धनु पळसकर ,तुषार सुनील आखाडे, अनिल अर्जुनराव पळसकर ,पवन तुळशीराम वाणी,चैतन्य शैलेंद्र आखाडे, सागर बाजड व कृष्णा रमेश बकाल यांनी उपोषण सुरवात केली. ज्याला गावातून उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. उपोषणास भेट देवून मागण्या संदर्भात चर्चा करण्यासाठी अतिरिक्त तहसीलदार पाटील, मंडळ अधिकारी भारत वाघ, तलाठी यांनी भेट दिली तर पंचायत समिती विस्तार अधिकारी गवई यांनी उपोषण स्थळी भेट देवून उपोषण कर्त्यांच्या सोबत चर्चा केली मात्र उपोषण करते जो परियंत ठोस कार्यवाही होणार नाही तो परियंत उपोषण सोडणार नाही या मागणीवर ठाम आहेत.



# स्वाभिमानीचा नारा, करा कर्जमुक्त सात बारा

## व्यथा मांडणारा लोकप्रतिनिधी निवडून देण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील श्री क्षेत्र असलेल्या संत सखाराम महाराज लोणी बू येथे दिनाक 6 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 9 वाजता मारोती मंदिर लोणी. येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष दामू अण्णा इंगोले यांनी कर्जमुक्त सात बारा या घोषणेचा शुभारंभ करत शेकडो शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती अर्ज वाटप करण्यात आले असून यावेळी इंगोले यांनी अनेक मुद्दे हाताळले यामधे त्यांनी प्रामुख्याने मागील वर्षापासून शेतकऱ्यांना खरीप हंगामातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीन चा पीकविमा मिळवून दिला आहे. तसेच यावर्षी सुद्द्धा त्यांनी सतत होणाऱ्या अवकाळी, अवर्षण,निसर्गाचा लहरीपणा आणि लोकप्रतिनिधीची अकार्यक्षमता यामुळे सतत शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडत आहे. त्यामुळे आम्ही या वर्षी पहिल्या पासूनच पिकविम्या बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, मंत्रालय आणि शेवटी उच्च न्यायालयात धाव घेतली तेंव्हा कुठे अर्ध्या शेतकऱ्यांना सोयाबीनच्या पीकविमा मिळाला असून उर्वरित शेतकऱ्यांना 20 फेब्रुवारीपर्यंत पीकविमा मिळण्या बाबतचे लेखी आश्वासन पीकविमा कंपनी कडून घेतले असल्याचे सांगितले.तसेच केंद्र शासनाने डीओसीचे भाव पाडून मोझांबिक देशांसोबत दहा वर्षांचा करार केल्याने शेतकऱ्यांची सोयाबीन ही 2013 च्याच भावात आज विकल्या जात आहे. पण याचे कोणालाच देणे घेणे नाही. विधानभवनात एकही आमदार या ज्वलंत प्रश्नावर बोलत नाही. केंद्र शासनाने पन्नास उद्योगपतींचे 68607 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले असून जनतेचा पैसा उद्योगपतींच्या घशात घातला असून त्याला कुठलाही अर्ज करण्याची गरज पडली नाही.मात्र संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यावर पीक कर्ज, शेतिऊपयोगी साहित्यांचे असे सर्व प्रकारचे कर्ज धरून फक्त 53 हजार कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यावर आहे. हे कर्ज उद्योगपतींना दिलेल्या कर्ज माफि पेक्षाही कमी असून यामधे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी हे कर्जमुक्त होऊ शकतात.त्या साठी सर्व शेतकऱ्यांनी कर्ज मुक्त सात बारा अर्ज भरून देण्याचे आवाहन करण्यात आले असून कर्जमुक्ती चा पहिला मेळावा रिसोड तालुक्यातील मोप येथून दिनांक 13फेब्रुवारी रोजी होणार असल्याने हजारोंच्या संख्येने यामधे सहभागी होण्याचे आवाहन यावेळी दामू इंगोले यांनी केले.यावेळी लोणी बू येथील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# अद्रक संशोधन केंद्र स्थापनेचा प्रश्न मार्गी लागणार, अखेर प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील अद्रक संशोधन केंद्र स्थापनेचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार असून सदरील केंद्र स्थापनेसाठी त्वरित कार्यवाही करावी, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री ना.धनंजयजी मुंडे यांनी आज संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे पदवीधर मतदार संघाचे आमदार सतिष भाऊ चव्हाण पाटील पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.
खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापन करावे यासाठी मी शासनस्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करत होतो. यासंदर्भात डिसेंबर 2022 व मार्च 2023 मध्ये झालेल्या अधिवेशनात मी तारांकित प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले होते. मात्र सभागृहात मंत्री महोदयांनी सदरील केंद्र स्थापनेचे आश्वासन देऊन सुध्दा काहीच कार्यवाही झाली नसल्याने यासंदर्भात बैठक आयोजित करण्याची विनंती कृषी मंत्री ना.धनंजयजी मुंडे यांच्याकडे केली होती. कृषी मंत्र्यांनी माझ्या मागणीची दखल घेत मंत्रालयात आज (दि.6) यासंदर्भात बैठक आयोजित केली होती. सन 2023 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तत्काल या अद्रक संशोधन केंद्राला मा.मंत्री.ना. धनंजय मुंडे यांनी प्रशासनाला आदेश दिले आहे.या अद्रक संशोधन केंद्र होणार असल्याने शेतकरी तथा नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



# एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलमध्ये प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षेचे आयोजन

## 10 फेब्रुवारीपर्यंत अर्ज आमंत्रित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आदिवासी विकास विभागातंर्गत कार्यान्वित असलेल्या एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलमध्ये सन 2024-25 या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याकरीता प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षा रविवार, दि. 25 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी 11 ते 2 या कालावधीत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, जांभुळघाट (ता.चिमूर) या ठिकाणी घेण्यात येणार आहे. प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षेचे आवेदनपत्र सादर करण्याचा अंतिम तारीख 10 फेब्रुवारी 2024 आहे.
इयत्ता 6 वीच्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व इयत्ता 7 ते 9 वीच्या वर्गातील विद्यार्थी अनुशेष भरून काढण्यासाठी चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता 5वी, 6 वी ते 8 वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित/आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.
ज्या पालकाचे वार्षिक उत्पन्न 6 लाखापेक्षा कमी आहे, अशा प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांचे पालक,शिक्षक व मुख्याध्यापकांनी सविस्तर माहिती व परीक्षा आवेदन पत्रासाठी नजीकच्या शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा येथील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प कार्यालय, चिमूर येथे संपर्क करावा.
जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळेमधील अनुसूचित व आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांनी एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलमध्ये प्रवेश घ्यावा, असे चिमूर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी एम.व्हि. डुले यांनी कळविले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# समता प्रस्थापित करण्यासाठीच अण्णा भाऊ यांनी बंडखोर नायक उभे केले : डॉ. संजय शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** अण्णा भाऊ साठे यांनी समाजात लोकशाही मूल्ये रूजविण्यासाठीच कथा , कादंबरी, नाटक, लोकनाट्य, या वाड्मय प्रकारातून बंडखोर नायक, नायिका उभ्या केल्या असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न , लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव प्रा.डॉ.संजय शिंदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन करतांना केले.

३ फेब्रुवारी २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व लोकशाहीर ,अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने नाट्य विभागात आयोजित 'नाट्य आणि साहित्याच्या अनुषंगाने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे विचार ' या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उदघाटक म्हणून डॉ.संजय शिंदे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, बुध्द, कबीर,छ. शिवाजी महाराज,महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स यांचे विचार आणि तत्वज्ञान याचे दर्शन अण्णाभाऊ साठे यांच्या संबंध साहित्यातून होते, याबरोबरच संविधानाने दिलेली लोकशाही मूल्ये रूजविण्यासाठी अण्णाभाऊंनी विविध जाती जमातीतील बंडखोर नायक उभे केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या संगीत विभागाचे प्रमुख,प्रा.डॉ. संजय मोहोड हे होते अध्यक्षीय समारोप करताना मोहोड म्हणाले की, अण्णाभाऊच्या शाहिरी,छक्कड गीतामधील नायक हे" रडणारे नसून लढणारे आहेत" संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे रणसिंग अण्णा भाऊंच्या "माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीय काहीली"या गीताने फुंकले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासनाच्या प्रमुख डॉ. वैशाली बोदेले यांनी केले, पाहुण्यांचा परिचय वैशाली दाभाडे यांनी करून दिला. या परिषदेत २५ संशोधकांनी आपले शोध निबंध सादर केले. या कार्यक्रमाला डॉ.संजय पाईकराव, डॉ.गितांजली बोराडे, डॉ.निर्मला जाधव, डॉ. गौरी कल्लावार, डॉ.किर्तीमालिनी जावळे, डॉ.विशाखा कांबळे, डॉ.पांडुरंग गादेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रा.गजानन दांडगे, डॉ.शेषराव पठाडे यांनी 'नमुया आधी देशभारती' हे गीत सादर केले,उदघाटन



झाल्यानंतर विद्या धनेधर, नितीन ससाणे, डॉ.सुनिल टाक, अर्जुन सोमवंशी,आकाश गवळी, डॉ.पठाडे, यांनी 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले आम्हा भिमराव 'हे गीत गायले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.अमजद सय्यद,प्रा.संतोष गालफाडे, रामदास ठोके, जयदत्त शुक्ला, सुरे, घोरपडे आडे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाखा शिरवाडकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ विशाखा कांबळे यांनी मानले.

# रासेयो शिबिर न घेणाऱ्या महाविद्यालयांवर नविन कुलगुरू कारवाई करणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या बहुतेक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबीर कागदावर चालतात. प्रत्यक्षात केवळ 30 टक्के महाविद्यालय शिबीर घेतात. नविन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी होत असताना रचनात्मक कामं करून घेण्यासाठी शिक्षण संस्थाचालक का पुढे येत नाहीत? त्यापेक्षा कुलगुरू म्हणुन काम करणाऱ्या पदाच्या व्यक्तींनी आपल्या व्यवस्थापनावर अंकुश ठेवला तर सर्व उपक्रम सर्वत्र चालु शकतात. कुलगुरूच जर विद्यापीठाच्या बाहेर पडत नसतील तर अशी दुरावस्था होणार? मात्र नव्याने पदभार घेतलेले कुलगुरू डॉ.श्री फुलारी यांनी आता या प्रश्नावर लक्ष्य घालणे महत्वाचे. एक गोष्ट स्पष्ट सांगायला पाहिजे की, कोणतंही युनिट असो किंवा संस्था असो प्रमुख पदावरचा व्यक्ती आपल्या कर्तव्याला जागा असेल तर जबाबदारीचे पालन व्यवस्थित होवु शकते. विविध उपक्रम घेण्यासाठी आणि करून घेण्यासाठी वेगवेगळ्या व्यवस्था घटनात्मकदृष्ट्या निर्माण झाल्या आहेत. मात्र प्रत्येकाच्या अंगी असलेली कमालीची उदासिनता नविन पिढीसाठी घातक ठरू शकते. कुलगुरू हा शिक्षण व्यवस्थेतला महत्वाचा घटक. उदा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ अंतर्गत शेकडो वरिष्ठ महाविद्यालय चालतात. शैक्षणिक सुधारणा असो किंवा गुणवत्ता यावर अंकुश ठेवण्याचे काम प्रमुखाचं असतं. पण दुर्दैवाने कुलगुरू हेच विद्यापीठ



सोडायला तयार नसतील तर मग शिक्षणाचा आयचा घो. आजवर कुलगुरू कधीही अचानक म्हणा किंवा कुठल्याही महाविद्यालयात सहज भेटीसाठी गेलेले जाणवत नाहीत. ज्यामुळे त्यांचा धाक महाविद्यालय व्यवस्थापनाला कुठेच वाटत नाही. एकच प्रश्न आम्ही हाती घेतला, तो म्हणजे महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम. खरं तर यासाठी आजवर केवळ 60000 रूपये निधी अनुदान असायचं. आता शासनाने देखील ज्यात वाढ करून 141000 रूपये अनुदान केले. एवढ्या पैशात महाविद्यालयातलं हे शिबीर ग्रामीण भागात दहा दिवस छानपैकी सर्व उपक्रमाने होवु शकते. मात्र जेव्हा संस्था चालकाला पैशाची भुक असते अशा वेळी कागदोपत्री घोडे नाचवले जातात आणि तसेच प्रकार मराठवाड्यात नांदेड असो कि संभाजीनगर पहायला मिळतात. खरं तर तरूण पिढी ग्रामीण भागात जाणं, तिथल्या संस्कृतीशी मिळुन-मिसळुन वागणं, श्रमदान, सांस्कृतिक आदी उपक्रम घेणं याचाच अर्थ कॉलेज जीवनात व्यक्तीमत्व विकास आणि सामाजिक दायित्व याचे धडे घेणे हा उद्देश या शिबीरामागचा. मात्र केवळ खाऊगिरीमुळे उपक्रमाकडे कमालीचे दुर्लक्ष प्रत्येकाचे दिसतं. घ्यायचे म्हणुन उपक्रम कागदावर घेतले जातात. चार बातम्या छापुन आणणं एवढंच काम. या सर्व अकार्यक्षमतेमुळे अशा उपक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांची देखील कमालीची उदासिनता दिसुन येते. दरम्यान दुसरा एक प्रश्न महत्वाचा वाटतो की, विद्यापीठ व्यवस्थापन चालवण्यासाठी शासनाकडून आणि लोकशाही मार्गाने वेगवेगळ्या समित्या ज्याला की सिनेट मेंबर वगैरे असे म्हणु शकतो. थोडक्यात संस्था डायरेक्टर प्रमाणे भुमिका ज्याला दिशा देण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत मंडळी विद्यापीठ कार्यकारिणीवर असते. पण अलीकडे सिनेट मेंबर पदाचा वापर केवळ राजकारणात मोठे होण्यासाठी करताना दिसतो. विद्यापीठात काय चाललंय? किंवा काय केले पाहिजे? गुणवत्ता सुधारण्यासाठी काय पाऊले उचलली पाहिजेत? या विषयावर कुणी कधी बोलताना दिसत नाही. असे शिबीरच होत नसतील तर मग सिनेट मेंबर काय कामाचे? असे सवाल पालक करताना दिसतात.

# मुस्लिम सेवा संघ औरंगाबाद शहर जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रविवारी शहरातील मिसारवाडी येथे असलेल्या मुस्लिम सेवा संघ औरंगाबाद शहर जनसंपर्क कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न झाला. मुस्लिम सेवा संघ भारताचे राष्ट्रीय अध्यक्ष फिरोज मासुलदार यांच्या नेतृत्वाखाली प्रदेश महासचिव जमील पठाण यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिम सेवा संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कैसर आझाद यांच्या हस्ते जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमात युवा प्रदेशाध्यक्ष वाजिदा शेख, मराठवाडा विभाग अध्यक्षा शकीला पठाण, उपाध्यक्ष शाहीन पठाण, जिल्हाध्यक्ष नफीस खान, महिला जिल्हाध्यक्ष सय्यद सलमा, ग्रामीण जिल्हाध्यक्ष कलीम कुरेशी आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून., सिराजुद्दीन भाई, एड. अल्मास बाजी, हिना शेख आदी अधिकारी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन औरंगाबाद शहर अध्यक्ष अहमद खान पठाण, जिल्हा उपाध्यक्ष व प्रसिद्धि प्रमुख सय्यद फेरोज आशिक, शहर सचिव अफसर खान पठाण यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्रदेश सरचिटणीस जमील पठाण यांनी कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, मुस्लिम सेवा संघ ही संघटना देशभरातील 22 राज्यात मुस्लिम समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी कार्यरत आहे. मुस्लीम सेवा संघ समाजहिताचे काम करत असताना आरोग्य, रोजगार आणि शिक्षणाला प्राधान्य देते.

देशभरातील मुस्लिम या संघात सहभागी होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचे पालन करून आपल्या समाजाचा विकास करू शकतात. या उदघाटन समारंभ प्रसंगी गौस खान पठाण, शमीम खान पठाण, आबासाहेब ढाकणे, रहीम सर, सय्यद अजीम, सलमान खान पठाण, अजमेर खान, शाकेर सौदागर, सलमान बाली, अफजल खान, नासेर खान, सोहेल पठाण, अब्दुल रहमान इ. .उपस्थित होते.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर